◆ऑक्टोबर २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक दहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

⌘ संपादक :
सुनील मेहता

⌘ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

⌘ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

⌘ अंकाची किंमत १५ रु.

⌘ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

⌘ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **मृणालिनी गडकरी भाषण** | २८ |
| **फ्रँकफ्रुट बुक फेअर** | ३१ |
| **पुस्तक परिचय** | |
| **तारकांच्या विश्वात :** पराग महाजनी | ३३ |
| **सुखाचा शोध :** वि. स. खांडेकर | ३७ |
| **आरोग्यासाठी योग :** अनु. मंगेश कश्यप | ४२ |
| **चित्तचित्रे, स्वप्नी जे देखिले :** | |
| संपादन – अरुण शेवते | ४७ |
| **साधंसुधं –** प्रमोदिनी वडके–कवळे | ५३ |
| **पुरस्कार** | ६३ |

⌘ मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

⌘ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षाची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*




**प्रकाशनक्षेत्रातले आऊट सोर्सिंग**

भारताला इंग्लिश पुस्तकांच्या निर्मितीची गेल्या दीडशे वर्षांची परंपरा आहे. मॅकमिलन, ओरिएंट लाँगमन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस वगैरे इंग्लडमधील प्रकाशन संस्थांनी भारतात आपल्या पाठ्यपुस्तकांच्या वाढत्या मागणीला तोंड देण्यासाठी इंग्लडमध्ये छापलेली पुस्तके जहाजाचा खर्च करुन येथे आणून विकण्याच्या ऐवजी येथेच त्या पुस्तकांची छपाई करावी असे ठरवले आणि त्यानुसार मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणी छापखाने उभारले, संपादकीय कार्यालये उभारली, आणि मूळ इंग्लिश पुस्तकांचे मुद्रण भारतातच सुरु केले. भारतीय पार्श्वभूमीवरची, भारतीय भौगोलिक, ऐतिहासिक वगैरे अभ्यासक्रमांवर आधारित पुस्तकांची लेखन - संपादन - प्रकाशन प्रक्रियाही येथेच होऊ लागली. त्यामुळे इंग्लिश ग्रंथ मुद्रण, संपादन, प्रकाशन यांची गुणवत्तापूर्ण अशी एक व्यवस्था येथे निर्माण झाली, आणि तिचा प्रभाव या क्षेत्रात येणाऱ्या भारतीय भाषांमधील प्रकाशन संस्थांवरही पडत राहिला. मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली वगैरे ठिकाणी जी मुद्रणालये आणि प्रकाशनसंस्था निघाल्या त्यांची निर्मिती दर्जेदार असे. शंभर वर्षांपूर्वी छापली गेलेली पुस्तके आजही छपाईच्या दृष्टीने आकर्षक व अचूक दिसतात. निर्णयसागर, मोतीलाल बनारसीदास वगैरे प्रकाशन संस्थांनी काढलेली संस्कृत पुस्तके मुद्रण दृष्ट्याही अचूक असल्याचे लक्षात येते. वृत्तपत्रांच्या दृष्टीनेही वेगवान मुद्रण करणाऱ्या छपाई यंत्रांची गरज असे, त्यामुळे इंग्लड - जर्मन, अमेरिकेतून अद्ययावत मुद्रण यंत्रे आयात केली जात.

एकंदरीत, ब्रिटिश सरकारच्या शिक्षणविषयक धोरणामुळे आणि इंग्रजी भाषेवर त्यांचा भर असल्यामुळे येथील शैक्षणिक तसेच अन्य गरजा भागवण्यासाठी ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथसंपादन यांना चालना मिळाली. आजच्या काळातील संज्ञा वापरायची तर ब्रिटिश प्रकाशन संस्थांनी भारतात आऊटसोर्सिंग करायला त्या काळीच आरंभ केला होता, असा याचा अर्थ होतो. आज अमेरिकेतील बहुतेक मोठ्या कंपन्यांचे बरेच काम आऊटसोर्सिंग द्वारे भारतातून चालते, आणि त्यातून भारताला अब्जावधी डॉलर्सची कमाई होते याचा आपल्याला अभिमान वाटतो.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्र नवे असूनही त्या आऊटसोर्सिंगद्वारे अब्जावधी डॉलर्सचे उत्पन्न भारताला मिळते, प्रकाशन क्षेत्रात आउटसोर्सिंग शंभरावर वर्षांपासून सुरु असले तरी त्याचा वेगळा असा हिशेब कधी मांडण्यात आला नव्हता, परंतु आता तो मांडण्यात येऊ लागला आहे आणि त्या क्षेत्रातही भारताची कामगिरी अभिमानास्पद आहे अशी खात्री पटते. त्याचबरोबर ही कामगिरी यापेक्षाही कितीतरी पट वाढू शकते हेही लक्षात येते.



गेल्या वर्षी प्रकाशन क्षेत्रातील आऊट सोर्सिंगद्वारे भारताला २० कोटी डॉलर्सची कमाई झाली असावी असा अंदाज व्हॅल्युनोट्स् डाटाबेस या कंपनीने दिला आहे. विविध औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचा मागोवा घेत राहणारी ही कंपनी आहे, आणि वेगवेगळ्या व्यवसायांमधील उलाढालीच्या आकडेवाऱ्यांचे संकलन, विश्लेषण आणि प्रकाशन करण्यात ती अग्रेसर आहे. याच अहवालात इ.स.२०१० पर्यंत भारताला प्रकाशन क्षेत्रातील आऊटसोर्सिंग मुळे १.१ बिलियन डॉलर्स म्हणजे ५०००कोटी डॉलर्सपर्यंत कमाई होऊ शकेल असा अंदाज दिला आहे. तेव्हा भारतीय प्रकाशन क्षेत्रात ते भारतीय भाषांमधील पुस्तकांच्या निर्मितीबरोबर इंग्लिश व अन्य जागतिक भाषांतील पुस्तकांच्या निर्मितीपूर्व प्रक्रियांकडेही अधिक लक्ष देण्याची निकड आहे, आणि त्यातून भरघोस प्राप्ती होण्यास मोठा अवसर आहे हे जाणून घ्यायला हवे.

गेल्या वीसपंचवीस वर्षात मॅकमिलन या जगप्रसिद्ध कंपनीने भारतात मोठ्या प्रमाणावर ग्रंथप्रकाशन विषयक आऊटसोर्सिंग सुरु केले आहे. त्याचे कारण उघड आहे. भारतात ऑफिस थाटायला इंग्लंड - अमेरिकेपेक्षा कमी खर्च येतो. इमारत बांधायचा किंवा भाड्याचा खर्च तुलनात्मक दृष्ट्या कमी असतो. येथे संपादनाच्या कामासाठी जाणकार तज्ज्ञ व्यक्ती कमी वेतनावर काम करायला मिळतात, डीटीपी ऑपरेटर्स आणि चित्रकार - सजावटकार यांनाही देण्यात येणारे मानधन अमेरिकन - युरोपियन किमान दरापेक्षा कितीतरी कमी असते. छपाईला योग्य अशी मुद्रण प्रत म्हणजे डीटीपी, प्रूफरीडिंग (करेक्शन), चित्रे - सजावट मुखपृष्ठ वगैरे करुन सीडीच्या रुपात मुद्रणयोग्य पुस्तकाची प्रत तयार करुन देणे या प्रक्रियेला लागणारा खर्च भारतात तुलनात्मक दृष्ट्या कमी पडतो छपाई मग हवी तेथे करता येते. त्यामुळे इतर प्रकाशन संस्थाही आपले काम भारतात करुन घेण्यासाठी आता सज्ज झाल्या आहेत.

सायंटिफीक टेक्निकल अँड मेडिकल या क्षेत्रातील पुस्तकांचा एकूण खप विशिष्ट पातळीवरच स्थिर असतो, परंतु त्यांच्या सिद्धतेसाठी त्यामानाने होणारी गुंतवणूक मोठी असते. अशा अभ्यासपूर्ण पुस्तकांच्या आशयात कुठलीही चूक राहू नये म्हणून खूप दक्षता घ्यावी लागते. अनेकदा प्रुफे वाचून संदर्भ तपासून घ्यावे लागतात. त्यामुळे अमेरिकेत हे सर्व काम करायला एखाद्या पुस्तकाबाबत पंचवीस हजार डॉलर्स लागत असतील तर भारतात तेच काम लाख दोन लाख रुपयात होऊ शकते. असे जेव्हा अमेरिकन प्रकाशकांच्या ध्यानात येते तेव्हा आऊट सोर्सिंग करण्यात आपला फायदा आहे हे जाणून, त्या दृष्टीने त्यांची मानसिकता तयार होते. या त्यांच्या मानसिकतेचा लाभ भारतासारख्या देशालाही होत राहतो. टेलर अँड फ्रॅन्सिस, एल्सव्हियर, लुवर, स्प्रिंगर वगैरे प्रकाशन संस्था आपली पुस्तके त्यामुळे आऊट सोर्सिंगसाठी भारतात पाठवू लागल्या आहेत.

सध्या आऊटसोर्सिंग सेवा देणाऱ्या पन्नासेक संस्था आपल्याकडे प्रकाशन क्षेत्रात आहेत. परंतु त्यापैकी बऱ्याच छोट्या आहेत, आणि मोठी कामे हाताळण्याची त्यांची क्षमता सीमित आहे. डीटीपी करणे, प्रूफ रीडिंग करणे, मजकुराचे शुद्धलेखन - स्पेलिंग - व्याकरण वगैरे तपासणे, संदर्भ तपासणे, चित्रे व नकाशे काढणे,

सजावट - मांडणीकडे लक्ष देणे ही कामे अपेक्षित असतात, त्याप्रमाणे मजकूर तयार करणे - लेखन करणे (कन्टेन्ट डेव्हलपमेंट) या कामालाही योग्य ती तज्ज्ञ माणसे मिळाली तर हे क्षेत्र आणखीही जोमात विस्तारू शकेल. विशिष्ट विषयावरची विशिष्ट पद्धतीची पुस्तके तयार करुन देण्याचे कंत्राट घेणाऱ्या संस्थांचीही गरज आहे. पुण्यात काही संस्था झिंबाब्वे, नायजेरिया, दुबई, थायलंड, कोरिया वगैरे कितीतरी देशांसाठी शालेय पाठ्यपुस्तके तयार करुन देत आहेत, आणि त्यातून चांगले उत्पन्न मिळवत आहेत.

प्रकाशन क्षेत्रातले एक नवे दालन म्हणून आऊटसोर्सिंगकडे बघायला हवे. उत्तम कार्यालय, विशिष्ट भाषांतील तज्ज्ञ जाणकार, डीटीपीची सुसज्ज यंत्रणा, उत्तम प्रूफरीडर्स, उत्तम संपादक, उत्तम चित्रकार व मांडणीकार - असा सगळा संच अशा प्रकाशन संस्थांनाही पुस्तकांच्या निर्मितीबरोबर परदेशी प्रकाशकांना अशा प्रकारच्या सेवा पुरवून कमाईत व प्रतिष्ठेत भर घालता येईल. स्वतःलाही जागतिक पातळीवर काहीतरी करुन दाखवण्याची प्रेरणा मिळू शकेल. कोट्यावधी डॉलर्सच्या कमाईची स्वप्ने बघायला हा उत्तम अवसर आहे.


## टी बुक क्लब म्हणजे दर्जेदार अनुवादाची हमी

**क्लबचे सभासद व्हा आणि क्लबची पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!**

### सभासद फी ५०रु. / या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक

या बुक क्लबचे सभासद **५० रु.** भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. **ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.** या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके २५% सवलतीत मिळतात.

### टी बुक क्लब १३ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| सिटी ऑफ बोन्स | मायकेल कॉनेली | अनु. अजित ठाकूर | २४०रु. |
| ओमेर्ता | मारिओ पुझो | अनु. अनिल काळे | २२०रु. |
| गॉन फॉर गुड | हर्लन कोबेन | अनु. अजित ठाकूर | २५०रु. |
| द डार्क क्रुसेडर | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २४०रु. |
| सन्स ऑफ फॉर्च्युन | जेफ्री आर्चर | अनु. अजित ठाकूर | ३५०रु. |
| टॉक्सीन | रॉबिन कुक | अनु. प्रमोद जोगळेकर | २५०रु. |

**एकूण रक्कम १५५०/- सभासदांना ७७५/- एकूण पोस्टेज ५०रु.**



# साहित्यवार्ता

## ❒ रामायण व्हीसीडीवर

रामानंदसागर व ग.दि. माडगूळकर यांचे रामायण आता मराठी व्हीसीडीवर उपलब्ध होत आहे.जीवनाचे सार सांगणाऱ्या रामायण या पौराणिक ग्रंथाने नेहमीच सर्वसामान्यांच्या मनात आदराचे व श्रद्धेचे स्थान मिळविले आहे. हे नव्याने सांगायला नको. पण हीच पौराणिक कथा दूरदर्शनवर जेव्हा रामानंद सागर यांनी प्रसारीत केली. तेव्हा रस्तेच्या रस्ते ओस पडत असत. या मालिकेतील पात्रांचा अभिनय, संवाद, भाषा, आदब साऱ्याच गोष्टी रसिकांनी श्रेष्ठ ठरवल्या. अशीच मोहिनी ग. दि. माडगूळकर यांच्या गीतरामायणाची गेल्या पंच्याहत्तर वर्षात ग. दि. यांच्या गीतरामायणाने रसिक मनावर अधिराज्य गाजवले आणि गाजवतो आहे. ग. दि. मांचे काव्य आणि त्यावर सुधीर फडके यांच्या सुरांचा साज रसिकांना आजपावेतो मंत्रमुग्ध करतो आहे. पौराणिक मालिकांमधील सर्वाधिक प्रेक्षकांनी पाहिलेली मालिका म्हणून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डसने गौरविलेल्या रामानंद सागर यांच्या रामायणाने प्रादेशिक भाषांच्या व्हीसीडी मार्केटमध्ये प्रवेश केला आहे. ह्या मालिकेच्या मराठी अनुवादाचे चार मास्टर व्हीसीडी पॅक मार्केटमध्ये येणार आहेत.

प्रत्येक मास्टर पॅकमध्ये १४ व्हीसीडी याप्रमाणे एकूण ५६ गिफ्ट पॅक बाजारात येणार आहेत. त्यापैकी प्रथम मास्टर व्हीसीडी पॅक बाजारात आल्यासुद्धा आहेत. या खास संपादित केलेल्या ५६ व्हीसीडीमध्ये रामायणाची संपूर्ण कथा असून त्यामध्ये लवकुश कथेचे प्रत्येकी २३ मिनिटांचे १६९ एपिसोड यांचा समावेश आहे. अशी माहिती आहे.

## ❒ दोन दिग्दर्शिकांचे व्य तिमत्त्व

विजया मेहता आणि सई परांजपे यांनी मराठी नाटक व चित्रपट जागतिक स्तरावर नेले. या दिग्दर्शिकांच्या व्य तिमत्त्वाची ओळख करुन देणारा बहुरंगी उपक्रम हा माटुंगा येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलात झाला. हा कार्यक्रम नंतर ई टीव्ही मराठी वाहिनीवर प्रक्षेपित केला जाणार आहे. मराठी रंगभूमीची इतिहासाची आणि रंगभूमी गाजविणारे कलाकार, लेखक, दिग्दर्शक यांची व तरुण रंगकर्मींना माहिती व्हावी, या भूमिकेतून चंद्रकांत कुलकर्णी यांना बहुरंगी या कार्यक्रमाची संकल्पना सुचली. बहुरंगी या स्टेज शोच्या मालिकेतील पहिला कार्यक्रम एकाच नाटकात अनेक भूमिका करणारे नट या संकल्पनेवर झाला. यात प्रभाकर पणशीकर



(तो मी नव्हेच), दिलीप प्रभावळकर (हसवाफसवी), अरुण नलावडे (गमंत जमंत) आणि भरत जाधव (सही रे सही) हे सहभागी झाले होते. बहुरंगी चा दुसरा भाग होणार आहे, दोन दिग्गज स्त्री दिग्दर्शिकांवर, विजया मेहता व सई परांजपे या दोघींनी कलाकारांची एक संपूर्ण पिढीच घडवली आहे. त्यांना एकाच वेळी एका रंगमंचावर आणून त्यांच्या व्य तिमत्त्वाचा व कार्याचा परिचय मुलाखत व सादरीकरणातून देण्यात येणार आहे. दिग्दर्शक विनय आपटे, विक्रम गोखले, सुलभा देशपांडे, यशवंत देव, सुहास जोशी, प्रदीप वेलणकर, नीना कुलकर्णी, यांचा सहभाग आहे.

## ❒ शिक्षण मुलांच्या दृष्टीने आनंददायी होण्याची गरज !

शिक्षण हे मुलांच्या दृष्टीने अधिकाधिक आनंददायी कसे होईल असेच वातावरण निर्माण होण्याची आवश्यकता असल्याचे मत ज्येष्ठ लेखक डॉ. अनिल अवचट यांनी व्य त केले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून मुख्याध्यापकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अवचट म्हणाले, की, आजचे शिक्षण हे समाज घडविण्यापेक्षा फ त करिअस्टिक माणसे घडवत आहे. मुलांना त्या त्या वयामध्ये वास्तवाची जाणीव करुन देणे गरजेचे आहे. प्रत्येक मुलगा हा निसर्गाचा एक चमत्कार आहे.

दुर्दैवाने आजची हुशार मुले वगळता इतर मुले आपल्या शाळांमधून केवळ न्यूनगंड बरोबर घेऊन जातात असे ते म्हणाले. करिअरच्या चिंतेने पालक घाबरट झाले आहेत. मुलांवर अकारण दबाव आणल्याने त्यांच्या मनावर शेवटपर्यंत हे ओरखडे कायम राहतात. मुलांना त्यांच्या आवडीच्या विषयातून, छंदातून शिक्षण देण्यासाठी तशा अभ्यासक्रमांची रचना करणे गरजेचे आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी इंडियन ए स्प्रेसचे वरिष्ठ वितरण व्यवस्थापक मनोज पलसे, वितरण व्यवस्थापक रॉय अब्राहम उपस्थित होते.

## ❒ तेंडुलकरांची नाट्य सफर ...

'अशी पाखरे येती' मधील हळुवार प्रेमानुभव, 'गिधाडे' तील हिंस्त्र दर्शन, 'घाशीराम कोतवाल' सारखी सांगीतिका आणि 'सफर ' ची निवेदनशैली, असे वेगवेगळे विषय ताकदीने मांडून मध्यमवर्गीय मानसिकतेला ध का पोचवणारे विजय तेंडुलकर यांच्यावर पहिल्यांदाच माहितीपट तयार होत आहे. रसिकांसमोर तेंडुलकर आणि हिंसा : काल आणि आज या' त्यांच्यावरील माहितीपटातून त्यांनी मांडलेल्या सामाजिक आणि राजकीय संदर्भांचा अन्वयार्थ शोधण्याचे काम केले जाणार आहे. असे माहितीपटाचे दिग्दर्शक अतुल पेठे यांनी सांगितली. ३५ नाटके व ५० एकांकिकांमधून तेंडुलकरांनी नातेसंबंधातील रोखठोकपणा, ढोंगीपणा आणि त्यातील कचकडेपणा नेमकेपणाने दर्शवला. जमिनीवर पाय ठेवून आसपासच्या वास्तवतेचे दर्शनही त्यांनी मध्यमवर्गीयांसमोर मांडले. तेंडुलकरांच्या योगदानाला युवा पिढीने केलेला हा सलाम आहे असे. पेठे म्हणाले, तेंडुलकरांच्या विचारांचे गांभीर्य माहितीपटातही उमटावे याकरिता त्यांच्या नाटकातील दुर्मिळ दृश्ये, चित्रफिती, छायाचित्रे यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रा. राम

बापट, गो. पु. देशपांडे, पं. सत्यदेव दुबे, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, विजया मेहता, जब्बार पटेल यांचे अभिप्रायही घेण्यात आले आहेत. या माहितीपटाची निर्मिती अमेरिकेतील कॅलिफोर्निया असोसिएशन ऑफ आर्टस तर्फे (कला) केली जात असून, मकरंद साठे यांनी त्याचे संहितालेखन केले आहे; ऑ टोबरमध्ये पुण्यात तेंडुलकर महोत्सवात हा माहितीपट प्रथम दाखवण्यात येणार आहे.

### ❒ प्रकाशक - वाचक - लेखक यांना आवाहन

२६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलंयकारी महापुराने (पोलादपूर) सार्वजनिक वाचनालय पूर्णपणे नष्ट झाले आहे. हे ५० वर्षापूर्वीचे जुने वाचनालय असल्यामुळे गावातील व परिसरातील लोक या वाचनालयाचा खूपच चांगल्या पद्धतीने उपयोग करतात. परंतु पुरात सर्व पुस्तकं व संदर्भग्रंथ वाहून गेल्यामुळे त्यांना व भावी तरुण पिढीला सकस वाचनाच्या आवडीला पुढील काही वर्षे मुकावे लागेल. पुण्यातील प्रकाशक / लेखक/ वाचक यांनी आपल्याकडील मराठी ललित वाङ्मय वाचनालयासाठी भेटस्वरुपात दिले तर त्याचा ग्रामीण भागातील वाचनवेड्या लोकांना निश्चित उपयोग होईल. नियतकालिके व मराठी भाषेव्यतिरि त इतर पुस्तके नकोत. ग्रंथालय पुण्यातील व परिसरातील वाचनप्रेमी लोकांमुळे परत समृद्धपणे उभे राहावे यासाठी योगदान हवे. संपर्कः सौ. मंगल प्रकाश शेठ, १९, एल. आय. सी. कॉलनी, पुणे - ९. फोन २४२२६९९४, सायं. ५ ते ७.

### ❒ दंतकथांच्या भाबडेपणात इतिहास बाजूलाच

घोरपडीच्या साह्याने तानाजीने सिंहगड सिंहगड सर केला, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुत्र्याने चितेत उडी घेतली, या सारख्या कथांवर आपण भाबडेपणाने विश्वास ठेवत आलो. त्याच कथा आपण पुढे सांगत आहोत. या रंजक गोष्टींमुळे मूळ इतिहास बाजूला राहतो, असे मत शिवसेना नेते राज ठाकरे यांनी नाशिक येथे व्य त केले. वैनतेय गिर्यारोहण व गिरीभ्रमण संस्थेच्या विसाव्या वर्धापनदिनानिमित्त सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात भरविण्यात आलेल्या इतिहासाचे साक्षीदार या इतिहासकालीन शस्त्र प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. श्री. ठाकरे म्हणाले, ऐतिहासिक लढाया आणि त्या काळच्या वीरांबाबत कोणताही आधार नसलेल्या गोष्टी सांगितल्या जात आहेत. शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध करताना वाघनख्या वापरल्याचे सांगण्यात येते; पण काही तज्ज्ञांच्या मते त्या वाघनख्या नव्हत्याच, असे सांगण्यात येते. शिवाजी महाराजांच्या जन्मतारखेबाबत असाच घोळ असल्याचे सांगून ते म्हणाले, की महाराजांचा जन्म ही घटनाच पुरेशी आहे. असाच प्रकार 'जेम्स लेन' प्रकरणातही घडत आहे. लेनचे पुस्तक न वाचताच त्यावर भाष्य करायला माझ्यापर्यंत काहीजण आले. पुस्तक वाचले का, असा प्रश्न विचारला असता, गप्प झाले.

### ❒ चार इयत्तांचे नवे अभ्यासक्रम - नवीन पाठ्यपुस्तके



शालेय अभ्यासक्रम बदलण्यास राज्य सरकारने अखेर अनुकूलता दर्शविली आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षापासून (२००६ - ०७) पहिली, पाचवी, नववी आणि अकरावी या चार इयत्तांचा अभ्यासक्रम बदलणार आहे. नववी आणि अकरावीच्या बदलाची गेल्या दोन वर्षापासून चर्चा आहे. यंदापासूनच अभ्यासक्रम बदल अपेक्षित होता; मात्र तो होऊ शकला नाही. प्राथमिक इयत्तांच्या अभ्यासक्रम बदलास सरकारने यापूर्वीच मान्यता दिली आहे. माध्यमिक इयत्तांच्या अभ्यासक्रम बदलाचा अडथळाही आता पार पडला आहे. त्यामुळे पुढील वर्षापासून या इयत्तांना नवीन अभ्यासक्रम असणार आहे. त्यानंतरच्या वर्षी दहावी आणि बारावीचा अभ्यासक्रम बदलला जाईल. या चारही इयत्तांच्या सर्व विषयांसाठी पुढील वर्षापासून नवीन पाठ्यपुस्तके असणार आहेत. त्यासाठीचा मसुदा ३१ ऑ टोबरपर्यंत पूर्ण होणार असल्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. वसंत काळपांडे यांनी 'सकाळ' ला सांगितले. ते म्हणाले, येत्या जानेवारीपर्यंत पुस्तके छपाईसाठी पाठविली जातील. सर्व पुस्तकांचे आकार नेहमीप्रमाणेच असतील. मात्र, त्यांची सजावट आणखी आकर्षक केली जाणार आहे. पहिलीचे पुस्तक रंगीत असतेच. अन्य इयत्तांच्या पुस्तकांमध्ये किमान दोन रंगांचा वापर केला जाणार आहे. पहिली आणि पाचवीची पाठ्यपुस्तके महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातर्फे, तर नववीचा अभ्यासक्रम शिक्षण मंडळातर्फे तयार केला जाणार आहे. अकरावीची भाषा विषयाची पुस्तके शिक्षण मंडळातर्फे, तर उर्वरित सर्व विषयांची पुस्तके खासगी प्रकाशकांतर्फे तयार केली जातील. राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्यानंतर राज्यात अभ्यासक्रम बदलाची चर्चा सुरू झाली. त्यानंतर शिक्षण मंडळाने या आराखड्यावर संबंधित घटकात व्यापक चर्चा घडवून आणली. दरम्यानच्या काळात नवीन राष्ट्रीय आराखडाही तयार करण्यात आला. त्यातील मुद्यांकडेही लक्ष देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### ❒ केंद्राचा माहिती अधिकाराचा नवीन कायदा

केंद्र सरकारचा माहिती अधिकाराचा नवीन कायदा १२ सप्टेंबर ला अस्तित्वात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा सध्याचा माहिती अधिकार कायदा रद्दबातल ठरला आहे. राष्ट्रपतींनी नवीन कायद्याच्या विधेयकावर १२ जून रोजी स्वाक्षरी केली होती. त्यानुसार नवीन कायद्याची माहिती, अंमलबजावणी, माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नियु त्या करण्याची लगबग सरकारी कार्यालयांत आहे. कायद्याच्या नवीन प्रारुपानुसार सामान्य प्रशासन विभाग आणि पुरवठा विभाग यांनीच या नियु त्या केल्या आहेत. इतर विभागांनी मात्र अद्याप याची दखल घेतलेली नाही. नव्या कायद्यानुसार राज्य माहिती आयोग आणि विभागीय माहिती आयोग अस्तित्वात येणे बंधनकारक आहे; मात्र त्यावरही कार्यवाही झाली नसल्याचे सांगण्यात आले. कायद्याची अंमलबजावणी कशी करायची यासाठी यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधिनीला (यशदा) नोडल एजन्सी म्हणून नेमले आहे. यशदा ने केलेल्या पुस्तिका कार्यालयांना

देण्यात आल्या आहेत. राज्यात सध्याच्या कायद्यानुसार अनेक प्रकरणे विविध कार्यालयांकडे प्रलंबित आहेत. जुनी प्रकरणे जुन्याच कायद्यानुसार मार्गी लागतील. नवीन कायदा आल्यानंतर बऱ्याचदा अशीच पद्धत अवलंबली जाते. त्यामुळे या प्रकरणांसाठी संबंधितांना नव्याने अर्ज करण्याची वेळ येणार नाही. देशासाठीचा कायदाही महाराष्ट्राच्या धर्तीवर आहे. त्यामुळे त्याच्या अंमलबजावणीत फारशी अडचण येणार नाही. सध्याच्या कायद्यात माहिती देण्यासाठी १५ दिवसांची मुदत होती. ती आता तीस दिवस झाली आहे. राज्यातील सध्याच्या कायद्याचा वापर करुन १७ हजार जणांनी विविध शासकीय कार्यालयांकडून माहिती मागितली. त्यातील १५ हजार अर्जांवर निर्णय झाले. जवळपास ८६४ अर्जांवर लोकायु तांपुढे सुनावणी सुरू आहे.

### ❒ कारागृहातील वातावरण बदलण्यास गांधी विचार उपयु त

कारागृहाच्या भावी अधिकाऱ्यांनी महात्मा गांधींचे विचार समजून घेण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे कारागृहातील वातावरण व व्यवहार बदलण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होय. असे गांधी विचार परीक्षांचे संयोजक बाळासाहेब सरोदे यांनी सांगितले. दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी गांधी विचार परीक्षांचे विभगीय संयोजक डॉ. सुधाकर खराडे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. ए. पाथ्रीकर, असीम सरोदे आदी उपस्थित होते. उमेश गुंडरे, दिगंबर इगवे, प्रकाश परदेशी यांनी स्वागत केले.

### ❒ शिवराय वाचनालयाचे उद्घाटन

वडगाव बुद्रुक येथील छत्रपती शिवराय वाचनालयाचे उद्घाटन नुकतेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते झाले. धोंडिबा सुतार, हरिदास चरवड, महादेव रामुगडे, तुकाराम वासुंडे आदी या वेळी उपस्थित होते. विवेक कुदळे यांनी प्रास्ताविक केले. विष्णू गरुड यांनी सूत्रसंचालन केले. महादेव रामुगडे यांनी आभार मानले.

### ❒ भाषेच्या उपयोजनावर अभ्यासक्रम

भाषेचा व्यावहारिक उपयोग, संज्ञापनशास्त्र, व्य तिमत्व विकास आदींसाठीचे खास अभ्यासक्रम इन्स्टिट्यूट ऑफ लँग्वेज अँड कम्युनिकेशन टे नॉलॉजी तर्फे वीस सप्टेंबरपासून सुरु झाला आहे. संस्थेच्या प्रमुख डॉ. दुर्गा दीक्षित म्हणाल्या, पारंपरिक पदवी शिक्षणाला पूरक असे हे अभ्यासक्रम आहेत व्य तिमत्त्व विकास, आवाजशास्त्र (व्हाइस कल्चर), चित्रपट रसग्रहण आदींसाठीही अल्पमुदतीचे अभ्यासक्रम आहेत. महात्मा फुले संग्रहालयाच्या आवारात सायंकाळच्या वेळात प्रोफेशन लँग्वेज कम्युनिकेशन, कम्युनिकेशन स्किल्स, व्हाईस कल्चर आदी अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.

### ❒ माणसाच्या उत्कट भावनेतून कवितेचा जन्म : महाम्बरे

कविता ही माणसाच्या उत्कट भावनेतून जन्म घेते. म्हणूनच सर्जनशील मनाला



व्य त करण्याचे सहजसुंदर माध्यम म्हणून कविता मानली जाते, असे मत कवी गंगाधर महाम्बरे यांनी व्य त केले. सिम्रेट पब्लिकेशन्सने प्रसिद्ध केलेल्या प्रतिभा आडकर यांच्या 'जाणीव ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन त्यांनी केले. नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे, प्रतिभा शाहू मोडक, या वेळी उपस्थित होते. महाम्बरे म्हणाले, सर्जनशील मनाला अनेक विचारांनी तुडुंब भरलेले आपले मन मोकळे करायला कविता हे प्रभावी माध्यम वाटते. आडकर यांच्या कविता, एका सुसंस्कारित महिलेचे भावविश्व विविध अंगांनी उलगडून दाखवतात. त्यांच्या जगण्यातला भावनिक उद्गार त्यांच्या कवितेतून उमटला आहे. या कविता कवितेतून उमटला आहे. या कविता विविध विचारप्रवाहांना प्रवृत्त करणाऱ्या आहेत. जीवनात आलेल्या अडचणी, चढउतार, मिळालेले यश, वाट्याला आलेले सुख आणि दुःख माझ्या कवितांमधूनही प्रकट झाले आहे, असे प्रतिभा आडकर यांनी सांगितले.

### ❒ साने गुरुजी विचार प्रसारासाठी संस्कार वाहिनी

बाल आणि कुमार वयोगटातील मुलांवर संस्कार करण्याच्या हेतूने साधना ट्रस्ट साने गुरुजी संस्कार वाहिनींचा उपक्रम सुरु करणार आहे. असे 'साधना' चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी सांगितले. 'साधना' साप्ताहिक हीरक महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. ध्येयवादी व सामाजिक बांधिलकी मानणारे साप्ताहिक म्हणून 'साधना' ची ओळख आहे. श्री. दाभोळकर म्हणाले, विशिष्ट पद्धतीने बांधण्यात आलेल्या वाहनाद्वारे महाराष्ट्राच्या मागास भागातील विद्यार्थ्यांपर्यंत संस्कारमय पुस्तके, ध्वनी – चित्रफितींच्या माध्यमातून साने गुरुजींचा व राष्ट्रीय एकात्मतेचा विचार पोचविणे, अशी संस्थेची योजना आहे. वाहनात साने गुरुजींची पुस्तके, संस्कारक्षम बालसाहित्य, संस्कार करणाऱ्या आणि मुलांना आवडणाऱ्या चित्रफिती, त्या दाखविण्यासाठी व्हिडिओ प्रोजे टर, वैज्ञानिक खेळणी आणि काही अभिजात मराठी पुस्तके या वाहनात उपलब्ध करुन देण्याचा विचार आहे. काही कार्यकर्तेही या वाहनात असतील. हे वाहन ग्रामीण भागातल्या एखाद्या शाळेत गेले तर त्या शाळेचा सांस्कृतिक महोत्सवच साजरा होऊ शकेल. यासाठी महापालिकेच्या वतीने दहा लाख रुपयांची मदत करण्याचा प्रस्ताव आहे. ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान, सदानंद वर्दे, अप्पासाहेब सा. रे पाटील आणि डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी महिन्यापूर्वी महापालिका आयु त नितीन करीर यांची भेट घेतली होती. साने गुरुजी संस्कार वाहिनीसाठी सुमारे तीस लाख रुपये खर्च येणार असून त्यापैकी दहा लाख रुपये महापालिकेने द्यावेत, अशी विनंती करण्यात आली होती.

### ❒ मन कल्लोळ कल्लोळ

स्वप्न जाणिवा... कधी हजारो मुंग्या डसल्याचे, कधी कुणीतरी मारायला धावतंय याचे, त्यातून निर्माण होणारी भीती आणि वास्तवाशी वाढत जाणारे अंतर... स्किझोफ्रेनिया आजाराची ही सुरवात, पण या वाटेवरही आशा आहे, तेथूनही परत येता

येते, हा दिलासा देणारा कार्यक्रम स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन या संस्थेने या मनाच्या विकारात भावना, विचार व वर्तन यामध्ये ताळमेळ राहत नाही. रुग्णाला होणाऱ्या भासांमुळे त्याच्यात तीव्र अस्वस्थता, एकटेपणा, भीती, निराशा निर्माण होत जाते. त्यामुळे रुग्णांबरोबर नातेवाइकांचेही जीवन उद्‌ध्वस्त होऊ शकते, पण योग्य औषधोपचार घेतले, रुग्णाला समजून घेऊन प्रशिक्षण दिले, समुपदेशन केले तर रुग्णही बरा होऊ शकतो, मानसिक आजारांबद्‌ल समाजात जागरुकता निर्माण होण्याची गरज आहे. छिन्नमनस्कता झालेल्यांना रुग्ण न समजता शुभार्थी मानणे असा सकारात्मक दृष्टिकोन हवा. शुभार्थींनी लिहिलेल्या कवितांचा आधार घेत, त्यांचे अनुभवविश्व प्रा. सुजाता शेणई व प्रा. वैशाली दाबके यांनी शब्दबद्ध केले. डॉ. जगन्नाथ वाणी या वेळी उपस्थित होते.

### ❐ विज्ञानाचा मानवी चेहरा समोर यावा

वेगवेगळे सिद्धान्त, नियम, प्रयोग यापुरतेच विज्ञान मर्यादित नाही. विज्ञानाच्या क्षेत्रातही वादविवाद झडत असतात, एकेका सिद्धान्तामागे मोठा आणि रंजक इतिहासही असतो आणि मुख्य म्हणजे मानवी प्रयत्न असतात. विज्ञानाचा हा चेहराही माध्यमांनी पुढे आणला पाहिजे. असे आवाहन ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर यांनी केले. विज्ञान सर्वांसाठी आहे. त्याचा संबंध सर्वांशी येतो. दैनंदिन जीवनातील विज्ञान, निसर्गातील विविध घटनाक्रमांमागील विज्ञान, विज्ञानातील कोडी.. हे सारे लोकांपर्यंत नेण्यासाठी माध्यमांनी कार्यक्रम तयार करावेत, असेही त्यांनी नमूद केले. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या (यूजीसी) कन्सोर्शिअम फॉर एज्युकेशनल कम्युनिकेशन (सीईसी) या आंतर विद्यापीठ केंद्राचा विक्रम साराभाई जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना प्रा. नारळीकर बोलत होते. यूजीसीचे अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर, सीईसीचे संचालक प्रा. जी. डी. शर्मा, 'सीईसी' च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रा. अजित केंभावी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. निगवेकर म्हणाले, जगभर मुद्रित माध्यमाची वाढ खुटंत असली, तरी भारतात आणि चीनमध्ये त्याची वाढ लक्षणीय आहे. या सर्व माध्यमांत योग्य ठरतील अशा तंत्रज्ञानांची मदत घेत दर्जेदार शैक्षणिक कार्यक्रम विकसित झाले पाहिजेत. सीईसीने त्या दृष्टीने पाऊल टाकले आहे. यंदापासून सर्वोत्कृष्ट ईएमएमआरसी केंद्राला पुरस्कार देण्याचे प्रा. शर्मा यांनी जाहीर केले. कोलकत्ता केंद्राने पहिला पुरस्कार पटकावला. पुण्यातील इएमएमआरसीचे संचालक समीरण वाळवेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### ❐ माऊलींच्या समाधी मंदिराची दुरुस्ती सुरू

ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिराच्या गेली ४० वर्षे रखडलेल्या दुरुस्तीच्या कामास प्रारंभ झाला असून, भाविकांच्या मूलभूत सुविधांचाही विचार केला जाणार असल्याची माहिती देवस्थानचे विश्वस्त डॉ. सारंग जोशी यांनी दिली. वारकऱ्यांना यापूर्वीही जुन्या बांधकामुळे त्रास होत होता. सर्व सहकारी विश्वस्तांनी एकमताने मंदिर दुरुस्तीचा निर्णय घेतला. मात्र दुरुस्ती करताना मंदिराची पूर्वीची जडणघडण जपली जाईल, याची काळजी



विशेषत्वाने घेण्यात येणार आहे. वारकऱ्यांसाठी मूलभूत सुविधा, सुलभ शौचालय, स्वच्छतागृह यांची सोय करण्यात आली आहे. मंदिरात बऱ्याच वर्षांपासून पावसाळ्यात पाणी गळते, त्या सर्वच ठिकाणी दुरुस्तीचे काम चालू आहे. लाडूघर, शेजघर, स्वयंपाकघर यांच्यातही बदल करण्यात येईल. तसेच नागपूर मंडपाची लवकरच दुरुस्ती करुन तेथे भाविकांसाठी दोन मजली दर्शनबारी करण्याचा देवस्थानचा मानस आहे. दर्शनबारीसाठी एका भाविक महिलेने तीन लाख रुपये देणगी दिल्याचे सांगून डॉ. जोशी म्हणाले, ज्ञानेश्वर महाराजांच्या साहित्यासह, इतर संतांच्या साहित्यांच्या कॅसेट, सीडी, व्हिसीडी यांच्या विक्रीची सोय करण्यात येईल. तसेच मंदिरातील ध्यानमंदिरात गालिचा अंथरण्यात येईल. साधकांना फ त सकाळी सहा ते दोन पर्यंत आणि दुपारी चार ते सात या वेळेतच साधनेसाठी प्रवेश दिला जाणार आहे. सिद्धेश्वर मंदिरातील कळसावर नवीन घोडे बसविण्याचे काम चालू आहे.

### ❐ कोंडमाऱ्याला वाट मिळाल्याने कॉमनमॅन सामान्यांना आपलासा

सामान्य माणसाच्या कोंडमाऱ्याला आर. के. लक्ष्मण यांच्या कॉमन मॅन ने वाट करुन दिली. सामान्यांचे मत त्यांच्या व्यंगचित्रांतून व्यक्त होत असल्याने सगळ्यांना कॉमन मॅन बद्दल आपुलकी वाटते, असे मत व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी व्यक्त केले. श्री. लक्ष्मण यांच्या यू सेड इट या व्यंगचित्रसंग्रहाचे श्री. अविनाश भोमे यांनी कसं बोललात! या नावाने मराठीत रूपांतर केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन श्री. तेंडुलकरांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार, विश्वास मेहेंदळे, डॉ. प्र. चिं. शेजवलकर आदी उपस्थित होते. तेंडुलकर म्हणाले, व्यंगचित्र ही केवळ टिंगल - टवाळी उडविण्याचे साधन नाही. मुखवट्यापलीकडील माणसाचे मन त्यातून व्यक्त होते. विनोदी किस्से, प्रसंग खुलवत मिरासदार यांनी विनोदाचे महत्त्व श्रोत्यांना पटवून दिले. ते म्हणाले, जीवनातील दुःख विसरायला लावण्याची श ती विनोदात आहे. घटनेतील विसंगती पाहण्याची दृष्टी निर्माण झाल्यावर विनोदनिर्मिती होते. वंदना धर्माधिकारी यांनी सूत्रसंचालन केले.

### ❐ हिंदी भाषेबद्दल अकारण गैरसमज

हिंदी भाषेविषयी सर्वसामान्यांमध्ये असलेले भय, आकस आणि दुजाभाव हे तिच्या विकासातील मुख्य अडथळे ठरत आहेत. हिंदी भाषेची स्वतंत्र अस्मिता जपून लेखन आणि वाचनाद्वारे दैनंदिन जीवनात तिचा वापर वाढवण्याची गरज आहे. असे मत आर्य समाजाने हिंदी दिवसा निमित्त आयोजन केलेल्या परिसंवाद व्यक्त करण्यात आले. हिंदी भाषेचे अभ्यासक संजय भारद्वाज डॉ. दीप्ती गुप्ता, डॉ. गजानन जोग, गोवर्धन शर्मा, सुनील देवधर, बलदेव साधवानी यात सहभागी झाले. लेखिका डॉ. मालती शर्मा अध्यक्षपदी होत्या. डॉ. शर्मा म्हणाल्या, अभिव्यक्तीसाठी हिंदी ही सर्वात सक्षम भाषा आहे. हिंदीचे शब्दसामर्थ्य अफाट आहे. हिंदीला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा असली तरी देशातील सर्व राज्यांमध्ये तिला अजूनही लोकमान्यता

मिळालेली नाही. या परिस्थितीत सकारात्मक बदल घडवण्यासाठी सामान्यांनीच पुढाकार घ्यावा. डॉ. गुप्ता म्हणाल्या इंग्रजी भाषेचा सध्या गवगवा आहे. शिक्षण आणि नोकरीसारख्या ठिकाणी तिचा वापर अत्यावश्यक ठरत आहे. मात्र यामुळे हिंदीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

### ❒ महिलांना बरोबरीचे स्थान न दिल्यानेच विधेयक रखडले

अनेक क्षेत्रांमध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. स्त्री - पुरुष समानतेबाबत सातत्याने चर्चा होतात. मात्र, प्रत्यक्षात महिलांना आपल्या बरोबरीचे समजण्याची पुरुषांची मानसिकता नाही. म्हणूनच, संसदेत अद्याप महिला आरक्षण विधेयक रखडले आहे, अशी खंत चित्रपट अभिनेत्री आणि खासदार हेमामालिनी यांनी व्य त केली. पुणे फेस्टिव्हलमध्ये यशोदा कृष्ण बॅले सादर करण्यासाठी त्या पुण्यात आल्या होत्या. महिला आरक्षण विधेयकावर अनेकदा चर्चा होतात. त्याविषयी समितीची नेमणूक केली जाते. पण निर्णय काहीच होत नाही. कदाचित, महिलांचे कर्तृत्व पुरुषांना त्यांच्या समान वाटत नसल्यानेच विधेयकास विलंब होत असावा. पहिल्या पुणे फेस्टिव्हल पासून राधा मीरा, द्रौपदी असे विविध बॅले सादर करणाऱ्या हेमामलिनी यांच्यासमवेत त्यांची धाकटी मुलगी होती. त्या म्हणाल्या महाभारतातील द्रौपदीचा दृष्टिकोन मांडणाऱ्या कार्यक्रमातून आजच्या महिलांनाही प्रेरणा घेता येईल. सध्याच्या महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून, त्यांना सामोरे कसे जावे, याचे मार्गदर्शन यातून मिळेल. अनेक स्त्रीरूपे साकार केल्यावर यशोदा कृष्ण मधून मातेचे रूप सादर करणार असल्याचे सांगून, त्या म्हणाल्या, कृष्णजन्मापासून गोवर्धन पर्वत पेलण्यापर्यंतच्या कालावधीचा यात समावेश आहे. चित्रपट की नृत्य असा सध्या माझ्या मुलींपुढे असलेला पेच माझ्यासमोरही होता. मात्र नृत्यकला सोडायची नाही, असा आईने दिलेला सल्ला मानला आणि त्यानंतर संपूर्णपणे झोकून देऊन काम केल्याने नृत्य हीच माझी आराधना ठरली, अशा भावनाही त्यांनी व्यक्त केल्या.

### ❒ 'गप्पा मंत्र्यांच्या पत्नीशी'चे प्रकाशन

गप्पा मंत्र्यांच्या पत्नीशी या डॉ. सौ. सुवर्णा नाईक - निंबाळकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन मध्य प्रदेशाचे राज्यपाल डॉ. बलराम जांखड यांच्या हस्ते मुंबईत नुकतेच झाले. या प्रसंगी अशोकराव खोत, सीताराम वाघमाडे, सुरेश डावरे उपस्थित होते. महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय असलेल्या चोवीस मंत्र्यांच्या पत्नींच्या मुलाखती या पुस्तकात आहेत.

### ❒ न्यायाधीशांनी आत्मवृत्त लिहिण्याची गरज

आपल्याकडे न्यायाधीशांनी आत्मवृत्ते लिहिण्याची परंपरा नाही, त्यामुळे अनेक चांगल्या न्यायाधीशांचे अनुभव लोकापर्यंत पोचत नाहीत, अशी खंत ज्येष्ठ विधिज्ञ डॉ. सत्यरंजन साठे यांनी व्यक्त केली. न्या रमेश बापट यांनी लिहिलेल्या न्यायदानाच्या खुर्चीवरुन या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. साठे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.



इंद्रायणी साहित्य ने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. ज्येष्ठ पत्रकार प्रकाशित केले आहे. ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वास मेहेंदळे, केसरीचे संपादक डॉ. दीपक टिळक, इंद्रायणी साहित्य चे संचालक शाम कोपर्डेकर आदी या वेळी उपस्थित होते. डॉ. साठे म्हणाले, चांगल्या न्यायधीशांचे अनुभव पुस्तकरुपाने लोकापर्यंत पोचले, तर लोकांसाठीही तो अभ्यासाचा विषय ठरेल. न्या. बापट यांच्या पुस्तकात असे अनेक प्रामाणिक अनुभव वाचायला मिळतात. अन्याय होऊ नये म्हणून काही वेळा कायद्याच्याही पुढे जाऊन धडपडण्याची त्यांची वृत्ती यात जाणवते. कायद्याच्या नियमांमध्ये असलेल्या अवकाशाचा न्यायाधीश कसा वापर करतो यावरही बरेच अवलंबून असते. न्या. बापट यांचे अनुभव, त्यांचे प्रशासकीय कौशल्य, यांचा उपयोग होण्यासाठी विधी अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश करावा, अशी सूचना डॉ. मेहेंदळे यांनी केली.

### ❒ शिशू - गीत महोत्सवात अठरा शाळांचा सहभाग

डॉ. कलमाडी श्यामराव शाळेचा प्राथमिक विभाग गेली ५ वर्षे इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी शिशु - गीत स्पर्धा आयोजित करत असून, या वर्षी पुण्यातील १८ शाळांनी भाग घेतला. इंग्लिश, हिंदी, मराठी, पाश्चात्य गीतापासून ते बालगीतांपर्यंत सादर केलेल्या गाण्यांना उत्स्फूर्त दाद मिळाली. परीक्षक म्हणून इंदिरा सालियन व सायली पानसे यांनी काम पाहिले. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक डॉ. कलमाडी श्यामराव हायस्कूल, डॉ. केतकर रोड. द्वितीय क्रमांक - विद्या व्हॅली स्कूल - डॉ. कलमाडी श्यामराव हायस्कूल - औध. तृतीय क्रमांक - दिल्ली पब्लिक स्कूल, उत्तेजनार्थ - अभिनव विद्यालय, आर्मी पब्लिक स्कूल, सिटी इंटरनॅशनल स्कूल.

### ❒ नापास विद्यार्थ्यांसाठी शिबीर

दहावीच्या परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शिबिर आयोजित करण्यात लोकसत्ता ने दाखविलेले शिक्षणाबद्दलचे प्रेम व संवेदनशीलता अभिनंदनीय आहे असे उद्गार ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पु. ग. वैद्य यांनी काढले. सध्याचे पालक व विद्यार्थी अवास्तव अपेक्षा बाळगतात. विद्यार्थ्यांना सतत बोलणे, घरातील तणावाचे वातावरण याचा मुलांच्या आकलनशक्ती, स्मरणशक्ती व सर्जनशक्तीवर परिणाम होऊन त्यांची कार्यक्षमता नष्ट होते, असे पु. ग. वैद्य यांनी सांगितले. मुलांनाही आत्मसन्मान असतो, हे लक्षात ठेवून पालक व शिक्षकांनी त्यांच्याशी वागावे कठोर परिश्रम, धाडस, आत्मविश्वास, चिकाटी हे गुण असल्यास यश मिळविणे अश य नाही. त्याचबरोबर आपली मानसिकता सांभाळणे व अभ्यासाचे योग्य तंत्र अवगत करणे हेही महत्त्वाचे असते असे त्यांनी सांगितले. नापास म्हणजे वाईट ही संकल्पना पुसण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपल्या आई - वडिलांच्या आपल्याकडून बऱ्याच अपेक्षा असतात. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. त्यामुळे, नापास विद्यार्थ्यांनी स्वकष्टाने हे यश मिळवून दाखविले पाहिजे, असे दीपक पायगुडे यांनी सांगितले. शिबिराचे प्रवर्तक डॉ. अनंत देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

## ❐ शास्त्रज्ञ विज्ञानाचा परमार्थ सांगतात

थोर शास्त्रज्ञ आपल्या संशोधनामधून सृष्टीची सूत्रे पाळत विश्वात बदल घडवितात आणि विज्ञानाचा परमार्थ समाजाला सांगितला, असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले. डॉ. पंडित विद्यासागर यांनी लिहिलेल्या महामानव आईनस्टाईन या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते ४ सप्टेंबर रोजी झाले. भारतीय अवकाशशास्त्र संशोधन संस्थेचे माजी संचालक डॉ. प्रमोद काळे या वेळी प्रमुख पाहुणे होते. सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार अध्यक्षस्थानी होते. गंधर्व वेद प्रकाशनच्या वतीने दीपक खाडिलकर यांनी प्रास्ताविक केले. पुराणकाळापासून साधू – संतांनी समाजाला परमार्थ शोधण्याची दृष्टी दिली, शास्त्रज्ञांनाही आधुनिक काळातील संत म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या शोधांमधून त्यांनी विश्वाची संकल्पना समजून घेण्याच्या क्षमता विकसित केल्या. विश्वात बदल घडविले आणि त्याला सामोरे जाण्याची कुवत समाजामध्ये निर्माण केली. म्हणूनच आईनस्टाईन यांना महामानव संबोधिणे सार्थच आहे.

## ❐ आता नोटा छपाईसाठी खास शाई

बनावट नोटांचा प्रश्न गंभीर होत चालल्याने त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी चलनी नोटांच्या छपाईसाठी संपूर्ण भारतीय बनावटीची एक सुपर इंक विकसित करण्यात आली असून ही शाई वापरुन तयार करण्यात आलेली चलनी नोट स्कॅनरखाली तपासली असता विशिष्ट दृष्टिभ्रम तयार होत असल्याने बनावट नोटा ओळखणे सोपे जाईल असा कयास आहे. मध्य प्रदेशातील देवास येथील चलनी नोटांच्या छापखान्यात नव्या शाईद्वारे नुकत्याच काही चलनी नोटा प्रयोगादाखल छापण्यात आल्या त्यांचा रासायनिक दर्जा, टिकाऊपणा याची शास्त्रीय तपासणी झाल्यनंतरच या शाईच्या वापरासाठी अंतिम मंजुरी मिळणार आहे. सध्या एसआयसीपीए कंपनीने तयार केलेल्या खास ऑप्टिकल व्हेरिएबल इंक – ओव्हीआय शाईचा वापर करण्यात येतो. भारत अमेरिकेसह ५५ देशांमध्ये ही एकच शाई वापरली जाते. ही शाई किलोस दीड लाख रुपये दराने मिळते. २००२ साली उघडकीस आलेल्या ५०० रुपयांच्या बनावट नोटांची मालिका ओव्हीआय शाईनेच छापल्याचे आढळून आले आहे. त्याची चौकशी केली असता पाकिस्तानने चार किलो, ओव्हीआय शाई पासपोर्ट छापण्यासाठी खरेदी केली होती; परंतु आतापर्यंत असे पासपोर्ट छापण्यातच आले नाहीत, असे निष्पन्न झाले आहे.

## ❐ भटके – विमुक्त यांच्याबद्दल पूर्व ग्रहदृष्टी नको

एखाद्या समाजाकडे जन्मजात गुन्हेगार म्हणून पाहणे हे केवळ अयोग्य नसून अमानुषपणाचे लक्षण आहे. मालाड येथील दरोडेखोरांच्या हल्ल्यात चार पोलीस जखमी झाल्यानंतर हा हल्ला फासेपारधी समाजाने केल्याचे पोलिसांनी सांगणे आणि प्रसारमाध्यमांनीही त्याला तशीच प्रसिद्धी देणे योग्य नसल्याचे मत शरद पवार यांच्या कन्या व भट या विमुक्तांसाठी काम करणाऱ्या सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. सुप्रिया मुळे या गेल्या पाच वर्षापासून भटके आणि विमुक्त समाजातील मुलांच्या शैक्षणिक उत्थानासाठी काम करीत आहेत. हा समाज एकूण लोकसंख्येच्या केवळ पाच ते सहा टक्के असल्याने त्यांची राजकीय ताकद फारशी नाही. केवळ या कारणामुळेच त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास येथील सत्ताधाऱ्यांना वेळ नाही वा रस नाही. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना या समाजाविषयी प्रचंड आस्था होती. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात या समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी खूप परिश्रम घेतले. त्यांच्यानंतर शरद पवार यांनीही या समाजाला मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्यासाठी प्रयत्न केले. मात्र केंद्र सरकारच्या अजब धोरणामुळे पिछडों में पिछडा असलेल्या या समाजाला शिक्षण, नोकऱ्या वा राजकीय शिक्षण, नोकऱ्या वा राजकीय क्षेत्रात राखीव जागा मिळत नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. राज्याचे गृहमंत्री स्वतः गुन्हेगारांचा जातीवाचक उल्लेख करु नको, असे स्पष्ट निर्देश पोलिसांना देत असूनही पोलीस ऑन रेकॉर्ड किंवा ऑफ द रेकॉर्ड प्रसार माध्यमांशी बोलताना फासेपारधी असाच उल्लेख करीत आहेत. यातूनच त्यांची मानसिकता लक्षात येते.

## ❐ लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्‌सची सुधारित आवृत्ती प्रकाशित

लहान मुलांसह अबालवृद्धापर्यंत धाडसाने पछाडलेल्यांना प्रेरणा देणाऱ्या घटनांची नोंद असणाऱ्या लिम्का बु स ऑफ रेकॉर्ड्‌सच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच ऑलिम्पियन राज्यवर्धन राठोड याच्या हस्ते करण्यात आले. पक्षाघाताचा झटका आलेला असतानाही दिल्ली ते मारसिमिक ला हे १,१०५ कि. मी. अंतर टाटा सफारी गाडी स्वतः चालवत ५५ तासात पार करणारे सहशक्तीचे मालक नवीन पुलिया सर्वांचे आकर्षण ठरले. देशभरातील विक्रमांची नोंद ठेवण्याचे हे १६ वे वर्ष असून, या वेळी २४ नवीन माहितीपूर्ण विभाग आणि भारतीय ध्येयवेड्यांनी साध्य केलेल्या १० हजार प्रेरणादायी घटनांचा यात समावेश आहे. शिक्षण, वैद्यकशास्त्र, व्यवसाय, क्रीडा, निसर्ग, साहस यांच्याबरोबर या वर्षीपासून फॅशन, ॲनिमल वेलफेअर आणि पर्यायी औषध हे नवे विभाग समाविष्ट करण्यात आले आहेत.

## ❐ प्रधानसरांची आत्मकथा ‘माझे सत्याचे प्रयोग’

परस्यूट्‌स ऑफ आयडियल्स या आत्मकथनामध्ये वीरकथा लपली आहे. मात्र प्रधानसरांना तिचा गंधही नाही, त्यांच्या लिखाणात याचा अभिनिवेश कुठेही दिसत नाही. माझे सत्याचे प्रयोग या महात्मा गांधीजींच्या पुस्तकाच्या तोडीचे हे पुस्तक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर यांनी केले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी लिहिलेल्या परस्यूट्‌स ऑफ आयडियल्स या आत्मचरित्राचे प्रकाशन डॉ. गोवारीकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. रा. ग. जाधव होते. प्रा. म. द. हातकणंगलेकर आणि सविता भावे व्यासपीठावर उपस्थित होते. शिक्षणाचा प्रसार होतो तेव्हा शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील दरी मोठी होत जाते. दोनशे विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे प्रमाण सध्या आहे. शिक्षकांची संख्या खूप कमी

आहे हे खरे असले तरी खरी वाण आहे ती प्रधान सरांसारख्या शिक्षकांची असे सांगून गोवारीकर म्हणाले की, प्रधान सरांची विचारसरणी एखाद्या शास्त्रज्ञाच्या विचारसरणीसारखी आहे. दोन भाषांमधील कृत्रिम भिंती बंद केल्या पाहिजेत. त्यांच्यातील दळणवळण वाढविले पाहिजे, त्यासाठी दोन, तीन भाषेत लिहिणारे खूप लेखक निर्माण व्हायला हवेत. या इंग्रजी पुस्तकाच्या निमित्ताने प्रधानसरांनी एक नवा मार्ग दाखविला आहे, असे मत प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले. माझी वाटचाल या मराठीतील आत्मकथनात, तसेच आज प्रकाशित होत असलेल्या इंग्रजी आत्मकथनात प्रधानसरांचे पूर्ण जीवन आलेले नाही. त्यांचे हे जीवन त्यांच्या पुस्तकातील पुढील भागांतून पाहायला मिळते असा विश्वासही प्रा. जाधव यांनी यावेळी व्यक्त केला. ही आत्मकथने म्हणजे एका प्रधानसरांनी दुसऱ्या प्रधानसरांशी केलेला संवाद आहे. काही आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करणारी प्रधानसरांसारखी माणसेच पुढे स्वतः आदर्श बनतात, असेही ते म्हणाले. अमेय प्रकाशनचे उल्हास लाटकर यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले.

### ❒ ययाती, कोसला, उचल्या जर्मन भाषेत जाणार !

मराठी साहित्य विश्वात मैलाचे दगड ठरलेल्या काही कलाकृतींचे पुढील वर्षी जर्मनीत फ्रँकफूर्ट येथे भरणाऱ्या बुक फेअरच्या निमित्ताने जर्मन भाषेत रूपांतर करावे असा प्रस्ताव साहित्य अकादमीने मांडला असून त्याच्या पहिल्या टप्प्यात वि. स. खांडेकरांचे ययाती, भालचंद्र नेमाड्यांचे कोसला आणि लक्ष्मण गायकवाडांचे उचल्या या पुस्तकांना प्राधान्य मिळेल, अशी चिन्हे आहेत. अमेरिका आणि इंग्लंड पाठोपाठ पुस्तके निर्यात करणारा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून भारताचा लौकिक आहे. ऑ टोबर २००६ मध्ये भारतीय पुस्तके असा मुख्य विषय असणाऱ्या फ्रँकफूर्ट येथील बुक फेअरची तयारी राष्ट्रीय पातळीवर सुरू झाली असून इंडियन ॲण्ड जर्मन पब्लिशिंग यावर नुकतीच नॅशनल बुक ट्रस्टतर्फे एक कार्यशाळा दिल्लीत आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये शरद गोगटे आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता सहभागी झाले होते. जागतिकीकरणाच्या काळात मराठीतील अक्षर साहित्य समजल्या जाणाऱ्या पुस्तकांचे जर्मन अनुवाद करण्याच्या निमित्ताने मोठी बाजारपेठ खुली होण्याची संधी आहे. म्हणूनच मराठी प्रकाशकांनी आपल्याकडील उत्तमोत्तम साहित्य अनुवादासाठी कसे उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करावा. ययाती, कोसला आणि उचल्या या पुस्तकांसंबंधीच्या अनुवादाबद्दल साहित्य अकादमी आग्रही आहे. रणजित देसाईंचे स्वामी आनंद यादव यांचे झोंबी इ. पुस्तके भाषांतरित होण्याच्या दर्जाची असल्याचे मत मेहता यांनी व्य त केले. फ्रँकफूर्ट पुस्तक महोत्सवासाठी माझा साक्षात्कारी हृदरोग (अभय बंग), अफगाण डायरी (प्रतिभा रानडे), मुखवटा (अरुण साधू), मुस्लिम मनाचा शोध (शेषराव मोरे) इत्यादी पुस्तकांच्या जर्मन अनुवादासंबंधी चर्चा चालू आहे. अमराठी पुस्तकांमध्ये गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज (अरुंधती रॉय), तसेच शरदचंद्रचटर्जी आणि रवींद्रनाथ टागोरांचे निवडक साहित्याही जर्मन भाषेत जाण्याची चिन्हे आहेत.



फ्रँकफूर्ट महोत्सवात जगातले ११० देश आणि एकूण सहा हजार सातशे प्रकाशक - लेखक सहभागी होतील.

### ❒ असा तोडला पाकिस्तान

शशिकांत मांडके यांनी आपल्या ग्रंथातून भारतीय युद्धांचा केवळ इतिहास सांगितलेला नाही, तर विद्यार्थ्यांना त्यांची नव्याने माहिती करुन दिली आहे. लष्करात सामील होण्याकरिता तरुणांना प्रोत्साहित करावे, यासाठी त्यांनी हे ग्रंथलेखन केले आहे, असे सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल सतीश सातपुते यांनी असा तोडला पाकिस्तान या पुस्तकाचे प्रकाशन करताना सांगितले. लष्करात जाण्यास मराठी तरुण तयार नाहीत असे नाही. मात्र, त्यांना त्याबाबतचे योग्य मार्गदर्शन मिळत नाही. पालकांनी व समाजाने त्यांना प्रोत्साहन द्यावे, असेही सातपुते यांनी सांगितले. असा झुंजला हिंदुस्थान व मैत्रीच्या बुरख्याआड या पुस्तकांचे प्रकाशन अनुक्रमे अनुराधा मांडके व रत्नाकर मांडके यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या शाळांमधून शिकविल्या जाणाऱ्या इतिहासात १९६२, १९६५ व १९७१ या तीन युद्धाचा पुसटसाही उल्लेख नाही. त्या इतिहासाचे स्मरण करून देण्याचा प्रयत्न या पुस्तकांद्वारे केला आहे, असे लेखक शशिकांत मांडके यांनी सांगितले.

### ❒ जैन साधू - संतांबद्दल अवमानजनक मजकूर

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिंदी विभागाने पदवी अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या अनुपमा या पाठ्यपुस्तकात जैन साधू - संतांची थट्टा उडविणारा मजकूर असल्याचे उघडकीस आल्याने जैन बांधवांत संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात दोषी असलेल्या विरुद्ध त्वरित कारवाई न झाल्यास भारतीय जैन संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. बी. ए. व बी. कॉम. या अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षासाठी असलेल्या अनुपमा या डॉ. विकल गौतम संकलित पुस्तकात आचार्य रजनीश (ओशो) यांचा नये भारत कि नयी दिशा हा धडा आहे. त्यात जैनियों के मुनी नहाते नही, स्नान नहीं करते । बाकी जैन शास्त्रों में यह लिखा है, कि हाथ पर मैल जमा जाए तो उसे पोछना भी पाप है, उसको जमने देना चाहिए, सब तरह की गंदगी ओढकर सब तरह की उदासी, बीमारी ओढकर..! आदी अवमानजनक मजकूर आहे. या वर्षीच हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहे. रजनीश यांच्या पाठात जो मजकूर आहे, तो अत्यंत चुकीच्या माहितीवर आधारित आहे. भगवान महावीरांनी २,५०० वर्षापूर्वी पाणी कमी वापरण्याचा जो संदेश दिला होता, तो काळाची गरज ओळखूनच दिला आहे. पाणी कमी वापरा म्हणजे अस्वच्छ राहा, असे त्यांनी सांगितले नव्हते. भावार्थ लक्षात न घेता काही तरी लिहिणे व ते विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात लावणे, हा संपूर्ण प्रकार बेजबाबदारपणाचा असल्याचे ते म्हणाले, या प्रकरणी विद्यापीठाच्या हंगामी कुलगुरुपदाचा पदभार सांभाळलेले डॉ. व्ही. एस. जामोदे यांनी पुस्तकातील मजकूर अपत्तिजनक असेल, तर तो तातडीने अभ्यासक्रमातून वगळण्यात येईल, असे सांगितले.

## ❒ दिग्दर्शकीय खुर्चीची भेट...

देवबाप्पा, जिव्हाळा, सारख्या एकापेक्षा एक सरस चित्रपट देणारे ज्येष्ठ दिग्दर्शक राम गबाले यांनी रंगभूमी आणि सिनेमातील गुणी कलावंत दिलीप प्रभावळकर यांना आपली दिग्दर्शकाची खुर्ची प्रेमाने भेट दिली! पु. ल. देशपांडे लिखित बटाट्याची चाळ च्या नाट्यप्रयोगाच्या डिव्हीडी प्रकाशनानिमित्त प्रभावळकर आणि गबाले यांची नुकतीच भेट झाली होती. त्यावेळीच त्यांनी प्रभावळकर यांच्याकडे खुर्ची भेट देण्याची इच्छा व्य त केली आणि घरी भोजनाचे निमंत्रणही दिले. सुरेश अलुरकर आणि प्रकाश भोंडे यांच्या उपस्थितीत गबाले यांच्या घरी ही खुर्ची प्रभावळकर यांना देण्यात आली. डायरे टर असे इंग्रजी शब्द लिहिलेली ही खुर्ची गबाले यांनी अमेरिकेत खरेदी केली होती, या खुर्चीबरोबरच्या छोट्या पत्रामध्ये गबाले म्हणतात की, मानवी सुखदुःखाच्या संवेदनांचे भान आपल्या अभिनयातून प्रतीत होतो. या छोट्याशा भेटीतून मास्टर विनायक, राजा परांजपे आणि पु. ल. देशपांडे अशी दिग्दर्शकांची परंपरा आपल्याद्वारे अखंड चालू राहावी, हीच उदंड सदिच्छा !

आतापर्यंत आपण केवळ 'हसवाफसवी' या स्वतः लिहिलेल्या संहितेचे दिग्दर्शन केल्याचे प्रभावळकर यांनी सांगितले. ते म्हणाले की, दिग्दर्शन हा माझा पिंड नाही, पण तरीही दिग्दर्शन करण्याबाबतच्या गबाले यांच्या अपेक्षेचा मी संपूर्ण आदर करतो. किंबहुना एक कलावंत म्हणून त्यांच्या माझ्याबद्दलच्या अपेक्षा आणि त्यासोबतची भेट हीच माझी खरी कमाई आहे! हसवाफसवी चा शेवटचा प्रयोग पाहून डॉ. श्रीराम लागू यांनीही दिग्दर्शक पॉल म्युनी याचे चरित्र भेट दिले होते, अशी आठवण त्यांनी सांगितली.

## ❒ कमलनयन बजाज अध्यासनासाठी एक कोटी रुपयांची देणगी!

महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या सर्वोदय चळवळीशी संबंधित जमनालाल बजाज आणि कमलनयन बजाज यांची परंपरा चालू ठेवण्याच्या उद्देशानेच गोखले अर्थशास्त्र संस्थेला देणगी दिली असून त्यातून जागतिक दर्जाचे संशोधन हे अध्यासन करेल, असा विश्वास बजाज ऑटो लिमिटेडचे अध्यक्ष राहुलकुमार बजाज यांनी व्य त केला. उद्योगपतींकडून देणगी न घेण्याचे गोखले अर्थशास्त्र संस्थेचे अलिखित धोरण कमलनयन बजाज अध्यासनाद्वारे प्रथमच बदलण्यात आले. या अध्यासनासाठी बजाज यांनी एक कोटी रुपयांची देणगी दिली आहे.

कमलनयन बजाज अध्यासनाद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मोलाचे आणि मूलभूत संशोधन होईल. तसेच अर्थशास्त्राशी निगडीत चार अध्यासने संस्थेत सुरू करण्यात येतील, असे संस्थेचे संचालक डॉ. अजित सिन्हा यांनी सांगितले.

## ❒ डॉ. श्रीराम देशपांडे

डॉ. श्रीराम देशपांडे यांना वयाच्या ७६ व्या वर्षी पुणे विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली आहे. हभप लक्ष्मण रामचंद्र पांगारकर व्य ती, वाङ्मय आणि कार्य - एक पुनर्विचार हा त्यांचा प्रबंधाचा विषय आहे. पुणे विद्यापीठातील नामदेव अध्यासनातील



डॉ. अशोक कामत यांनी त्यांना मार्गदर्शन केले. डॉ. देशपांडे यांनी दहा वर्षापूर्वी निवृत्तीनंतर हिंदी विषयातील प्रबंधासाठी पीएच.डी. मिळवली होती.

## ❒ पुण्याच्या मु ती खैरे-पाटील हार्वर्ड मध्ये सहायक प्राध्यापक !

पुण्यातील मु ती खैरे - पाटील यांची अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये सहायक प्राध्यापक पदावर नेमणूक झाली. सौ. खैरे - पाटील यांनी पुणे विद्यापीठातून पर्यावरणशास्त्रात एमएस्सीत प्रथम क्रमांक मिळवला होता. त्यानंतर त्यांनी आयआयटी पवईतून व्यवसाय व्यवस्थापनात एमबीए केले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी मिळविली आहे.

## ❒ वि. स. खांडेकर - संग्रहालय

मराठी सारस्वताच्या दरबारामध्ये श्रद्धास्थान असलेले ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानपीठविजेते वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांचा समग्र जीवनपट उलगडून दाखविणारे एक स्मृती संग्रहालय शिवाजी विद्यापीठात सज्ज झाले आहे. या संग्रहालयाच्या रूपाने भाऊसाहेबांच्या शालेय दाखल्यापासून ते ज्ञानपीठापर्यंत त्यांच्या जीवनातील असंख्य मौल्यवान वस्तूंचे दर्शन नव्या पिढीला होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे व संग्रहालयाचे संचालक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी ही माहिती दिली. गुरुवार २ सप्टेंबर रोजी खांडेकरांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून हे संग्रहालय लोकार्पण करण्यात आले. भाऊसाहेबांच्या साहित्याची नव्या पिढीला ओळख होण्याच्या दृष्टीने हे केंद्र भविष्यात साधन व संशोधन केंद्र म्हणून विकसित व्हावे यासाठी विद्यापीठामार्फत प्रयत्न केले जाणार आहेत. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या पिछाडीस दक्षिणेला उभारलेल्या वि. स. खांडेकर भाषा भवन या भव्य वास्तूमध्ये दुसऱ्या मजल्यावर हे संग्रहालय उभारले आहे. यामध्ये खांडेकरांचा वंशवृक्ष, जन्मकुंडली, प्रभावित करणारे ग्रंथ, लेखक, जन्मघर, दत्तकघर, विविध ठिकाणची वास्तव्य घरे, शिरोड्यातील शैक्षणिक कार्य, लेखन प्रक्रिया, साहित्य सप्तपदी, वैनतेया तील निवडक लेख, पहिले पुस्तक, खांडेकरांची चित्रपट क्षेत्रातील कारकीर्द, साहित्य संमेलने, समकालिन साहित्यकार, खांडेकरांचे कोल्हापुरातील सांस्कृतिक नेतृत्व, समग्र साहित्यरचना, खांडेकरांना मिळालेले पुरस्कार, सन्मानपत्रे, स्मृती तिकीट (टपाल), गौरव अंक, अश्रू कादंबरीचे हस्तलिखित आदी वस्तू व साहित्यकृती यांची मांडणी करण्यात आली आहे.

## ❒ समाजप्रबोधन घडवणारा प्रभावी लोककला !

समृद्ध लोककलांचा वारसा हा महाराष्ट्राला सनातन काळापासून लाभला असून मनोरंजनातून समाज प्रबोधन घडविणारी भारूड ही एक प्रभावी लोककला आहे, असे मत डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्य त केले. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातर्फे साहित्य साधना मंडळाचे उद्घाटन बहुरुपी भारूड या देखणे यांच्या प्रयोगाने करण्यात आले. ज्ञान, भ ती, श ती जिथे एकवटते त्यातून महाराष्ट्राची संस्कृती निर्माण होते. भारूड ही लोककला संतवाङ्मयाचा अविष्कार असून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन यातून

बघावयास मिळते. यावेळी, चौघडा, संबळ, मृदुंग, वीणा, शिंग या पारंपरिक वाद्यांसह जात्यावरची ओवी, वासुदेव, कडक लक्ष्मी, वेडी, भोवरा, विंचू, जावई, गोंधळ, भुत्या, इ. भारूडाच्या रुपकांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच दत्ता पाचंगे यांचा चौघडा वादनाचा कार्यक्रमही यावेळी सादर करण्यात आला.

## ❒ अकरावे अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन

जालना येथे ११वे अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन सप्टेंबरमध्ये संपन्न झाले त्याचे उद्‌घाटन डॉ. मुन्शीलाल गौतम यांनी केले. बौद्धधर्म हाच दलित साहित्याचा आधार आहे. त्यामुळे साहित्याच्या माध्यमातून बौद्ध धर्माचा प्रसार होणे अपेक्षित आहे असे ते म्हणाले, अध्यक्षपदावरुन डॉ. रोहिदास वाघमारे म्हणाले, आंबेडकरी साहित्य आणि बौद्ध साहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अण्णाभाऊंचे साहित्य वास्तवाचे चित्रण करणारे आणि सर्वसामान्यांच्या व्यथावेदनांना वाचा फोडणारे आहे. बौद्ध धर्म हा उपेक्षितांच्या वेदनाव्यथा दूर करण्यास समर्थ आहे असे डॉ. आंबेडेकर यांना वाटत होते.

## ❒ पत्रकबाजी

नेस वाडिया महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ११ सप्टेंबर रोजी भरत नाट्य मंदिर येथे पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेच्या निकालात पक्षपातीपणाचा आरोप करीत पत्रके वाटल्याने करंडक विजेत्या बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने सायकल या आपल्या एकांकिकेचा प्रयोग रद्द केला. रसिकानंद संस्थेतर्फे बीएमसीसीची सायकल, नेस वाडिया महाविद्यालयाची होरा ऐकाजी आणि आयएमसीसीची शिमगा या पुरुषोत्तम मधील एकांकिका आयोजित केल्या होत्या. पुरुषोत्तम स्पर्धेच्या अंतिम फेरीत पारितोषिकप्राप्त एकांकिकांमध्ये स्थान न मिळाल्याने नेस वाडिया महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी परीक्षकांच्या निर्णयाविरुद्ध आक्षेप नोंदवला होता. एकांकिकांना सुरवात होण्याआधी वाडियाच्या विद्यार्थ्यांनी प्रेक्षागृहामध्ये पत्रकांचे वाटप केले. स्पर्धेच्या निकालात दुजाभाव झाल्याची तक्रार करीत प्रेक्षकांनी त्यांना एकांकिका कशी वाटली, याविषयीचे मत व्य त करावे, असे पत्रकात नमूद करण्यात आले. निकाल जाहीर झाल्यानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता, अशा प्रकारे परस्पर पत्रकबाजीच्या वाडिया च्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल बीएमसीसी च्या विद्यार्थ्यांनी हरकत घेतली. मात्र आमच्यावर अन्याय झाला आहे. त्याचा आता प्रेक्षकच योग्य निवाडा करतील असे सांगत वाडियाचे विद्यार्थी ठाम राहिले. त्यांच्या वर्तणुकीचा निषेध म्हणून बीएमसीसीने आपल्या एकांकिकेचा प्रयोग रद्द केला.

प्रयोग रद्द झाल्याने प्रेक्षकांनी तिकिटांचा परतावा मिळावा, अशी मागणी लावून धरली त्यांना पैसे परत करण्यात आले, मात्र प्रेक्षकांच्या आग्रहाखातर एकांकिकेतील काही गाणी वाडिया च्या विद्यार्थ्यांनी भरत समोरील रस्त्यावरच सादर केली.

## ❒ भास्करराव आव्हाड चतुरस्त्र व्य तिमत्त्व !

आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करणारे ॲड. भास्करराव आव्हाड हे



एक चतुरस्त्र व्य तिमत्त्व आहे. असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी काढले. रंगत संगत प्रतिष्ठानच्या वतीने ॲड. आव्हाड यांना यंदाचा जिंदादिल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी प्रा. रतनलाल सोनग्रा, आमदार उल्हास पवार उपस्थित होते. श्री. मिरासदार म्हणाले, की आव्हाड यांनी कायद्यासारख्या रूक्ष व व्यवहारप्रधान क्षेत्रात काम करीत असताना मनातील संवेदनशीलता जपली. अन्यथा वकील आणि कवी हे समीकरण दुर्मिळ आहे. आव्हाड यांच्या सार्वजनिक जीवनातील कर्तृत्त्वाचे रहस्य त्यांच्या जिंदादिल व्य तिमत्त्वातच आहे. शील आणि अशील सांभाळणारे वकील, असा आव्हाड यांचा उल्लेख केला जातो, तो योग्यच आहे. पाथर्डीसारख्या तालु यातून पुण्यात येऊन स्वकर्तृत्त्वाने आव्हाड यांनी कायदा शिक्षण, साहित्य आणि समाजकारणात उमटविलेला ठसा थ क करणारा आहे. प्रसिद्धीपासून श यतो दूर राहण्याचा त्यांचा स्वभाव आमच्यासारख्या राजकीय व्य तींनाही भावतो, असे प्रतिपादन श्री. उल्हास पवार यांनी केले. कायदा, साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात काम करतानाही आव्हाड यांनी जगण्याचा आनंद कायम जोपासला आहे, इतरांनाही वाटला. आपले मनोगत व्य त करताना ॲड. आव्हाड म्हणाले, मनुष्य जन्मापासून पुढे क्षणोक्षणी आयुष्य कमीच करीत असतो. त्यामुळे मिळणारे क्षण वाया घालवू नयेत, असे वाटते. आपल्या हातून फार चांगले घडत असेल, तरच काही करु या. असा विचार करण्यापेक्षा जे काही करता येईल, ते प्रामाणिकपणे करत राहणे यात मिळणारा आनंद वेगळाच ठरतो. गावाकडील संस्कारांच्या शिदोरीवर पुण्यात आलो व त्यानंतर येथे शिकत असताना झालेले साहित्यिक संस्कार जीवनाला वळण देऊन गेले.

## ❒ वृद्धांविषयीची अनास्था बदलण्यासाठी प्रयत्न हवेत !

पुण्याच्या महापौर त्रिभुवन म्हणाल्या की बदलत्या काळात घरातील वृद्धांना वृद्धाश्रमात ठेवण्याचे प्रमाण वाढल्यामुळे तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन मिळत नाही. ही परिस्थिती व वृद्धांविषयीची अनास्था बदलण्यासाठी सामाजिक पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. असे मत महापौर रजनी त्रिभुवन यांनी व्य त केले. समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अकरा तपस्वींचा शारदा ज्ञानपीठम्‌च्या वतीने सत्कार करण्यात आला. त्या वेळी सौ. त्रिभुवन बोलत होत्या. प्रा. सिद्धेश्वर फडके, डॉ. रघुनाथ काकडे, पं. भास्करबुवा जोशी, डॉ. विश्वनाथ बेडेकर, चं. प. भिशीकर, बाबूराव शिर्के, प्रयागबाई कराड, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, प्रा. गेल्लाराम असनानी, प्रा. वासुदेव बापट यांचा सत्कार करण्यात आला. सिंबायोसिस चे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, सी पॅलेस हॉटेलचे मालक रामचंद्र धाबडिया, पीठम्‌चे संस्थापक संचालक पं. वसंतराव गाडगीळ, पीठाध्यक्ष श्री. पु. गोखले आदी या वेळी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना श्री. भिशीकर म्हणाले, माणूस किती जगला, यापेक्षा सात्विक व दैवी गुण विकसित करण्यासाठी त्याने किती प्रयत्न केले, हे अधिक महत्त्वाचे. समाजातील मूल्य व्यवस्था उद्‌ध्वस्त होऊ नये, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. डॉ. मुजुमदार

म्हणाले, कुटुंबात आजी – आजोबांचा नातवंडांना कंटाळा वाटतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी वृद्धांचा सत्कार करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. पं. भास्करबुवा जोशी यांनी ग्वाल्हेर घराण्यातील चीज सादर केली. पं. गाडगीळ यांनी प्रास्ताविक केले.

सत्कारापेक्षा कामासाठी सवड द्या. समाजाने पुढील आयुष्यात माझे सत्कार करण्यापेक्षा, कामासाठी सवड द्यावी, अशी मागणी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केली. ते म्हणाले, आयुष्य किती मिळेल माहीत नाही. पण किती काळ काम करू शकेन, याविषयी जाणीव निर्माण होत चालली आहे. त्यामुळे आता मला वह्या वाटप, सामुदायिक लग्न अशा कार्यक्रमांना बोलवू नका. येथून पुढे व्याख्याने, भाषणे, मिरवणूक काही नको. हा सत्कार माझा शेवटचाच सत्कार असेल.

### ❐ कठोर परिश्रमांबरोबरच आदर्श शिक्षकामुळे यश

कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल, तर कठोर परिश्रमाची गरज आहेच, शिवाय त्याच्या जोडीला मार्गदर्शन करणारा आदर्श शिक्षक असावा लागतो. तोच उत्तम नागरिक घडवितो, असे मत ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांनी व्य त केले. लोकमंगल प्रतिष्ठानच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. रामदास चौडे, लाला भिलारे, मुरली मोहोळ, महादेव होनराव आदींचा या वेळी श्री. फुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.





मृणालिनी गडकरी यांना २००४ सालासाठीचा साहित्य अकादमीचा अनुवाद पुरस्कार प्रदान करण्यात आला. ह्या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते, डी. जयकांतन व अध्यक्ष होते गोपी चंद नारंग. त्याप्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणाची खूप प्रशंसा झाली. आमच्या वाचकांसाठी संपूर्ण भाषण इथे देत आहोत.

'आज मला आपल्यामध्ये येता आलं, ह्याचा अतिशय आनंद वाटतोय. आपल्याप्रमाणेच एक अनुवादक म्हणून माझे अनुभव आणि माझे अनुवादासंबंधीचे विचार आपल्या समोर मांडताना खरोखरच समाधान वाटतंय. साहित्य

अकादमीनं मला ही संधी दिल्याबद्दल मी साहित्य अकादमीची आभारी आहे.

खरं सांगायचं तर ह्या क्षेत्रात माझा प्रवेश सहजपणे झाला. संशोधनासाठी मी रवीन्द्रनाथ टागोरांच्या काही कवितांचे अनुवाद करण्यासाठी दुर्मिळ संधी मला मिळाली. ह्या आणि ह्यांच्या पुढच्या अनुवादांनी मला खूप काही शिकवलं. बिनचूकपणा, नेमकेपणा, प्रामाणिकपणा, मूळ साहित्यकृतीशी इमान ही चांगल्या अनुवादकाची गुणवैशिष्ट्य आहेत हे लक्षात आलं. मूळ लेखन आणि अनुवाद ह्यांची निर्मितीप्रक्रिया सारखीच सर्जनशील असते. अनुवादकाजवळही कलावंताची प्रतिभा आणि संवेदनशीलता असावी लागते. म्हणजे मग मूळ साहित्यकृतीशी प्रामाणिक, मूळ लेखकाच्या शैलीशी जवळीक साधणारा, अभ्यासपूर्ण आणि मूळ साहित्यकृती इतकाच परिणामकारक असेल तर तो स्वतंत्र कलाकृतीच ठरतो. ह्याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. सुजीत मुखर्जी ह्यांनी रवीन्द्रनाथ टागोरांच्या गोरा ह्या कादंबरीचा केलेला इंग्रजी अनुवाद. साहित्य अकादमीत तो प्रकाशित केला आहे. ह्या संदर्भात लुइ बोर्जेस ह्याचं एक भाष्य आठवतं. त्यांना विशिष्ट अनुवादाबद्दल विचारलं असता ते म्हणाले होते मूळ साहित्यकृतीनं अनुवादाशी इमान राखलेलं नाही. ह्याचा अर्थ मूळ साहित्यकृतीनं अनुवादाशी इमान राखलेलं नाही. ह्याचा अर्थ मूळ साहित्यकृतीतील गुणदोष अनुवादातही आले पाहिजेत.

आरंभी मी अनुवादाला माझा छंद मानत होते. स्वान्त सुखाय मी अनुवाद करते असं माझं मनात मत होतं. पण आता अनुवादक म्हणून माझी ओळख पक्की झाल्यावर माझा दृष्टिकोन बदललाय. असं म्हटलं जातं की अनुवाद हा दोन भिन्न संस्कृतींना जोडणारा पूल असतो. असं असेल तर ह्या पुलाचा शिल्पकार अनुवादकच असतो. कारण मूळ साहित्यकृतीत प्रतिबिंबीत झालेल्या संस्कृतीचा अन्य भाषक समाजाला



त्यांच्या भाषेतून परिचय करुन देण्याचं काम अनुवादकच करत असतो. रामायणातल्या चिटुकल्या खारीप्रमाणे, ह्या कामातील माझा वाटा मीही उचलत आहे. अनुवादक मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा अशा दोन्ही भाषांना समृद्ध करून दोन्ही भाषांची उपासना करत असतो. त्यातून त्यास अतीव समाधान मिळते. जगभर भरलेल्या भिन्न भिन्न संस्कृती जाणून घेण्यासाठी अनुवाद आवश्यक आहे. भिन्न धर्मीय, भिन्न राष्ट्रीय, भिन्न जातीय, भिन्न पंथीय लोकांना जवळ आणण्याच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहता अनुवाद ही आता काळाची गरज आहे. भारतासारख्या बहुभाषिक आणि भिन्न प्रादेशिक संस्कृती असणाऱ्या देशात ही गरज अधिकच आहे.




मात्र आजसुद्धा समीक्षक अनुवादित साहित्याची गंभीरपणे दखल घेत नाहीत. वाचकसुद्धा ह्याला अपवाद नाहीत. काही समीक्षकांना त्यात मौलिकतेचा अभाव दिसतो. ह्या बाबतीत माझं मत असं आहे की ज्या वाचकांना किंवा समीक्षकांना मूळ आणि लक्ष्य भाषा आणि त्या भाषा ज्या प्रदेशात बोलल्या जातात तेथील संस्कृती अवगत असतील, तेच अनुलादाला योग्य तो न्याय देऊ शकतील.

अनुवादप्रक्रिया अवघड तर खरीच. मराठी आणि बंगाली ह्या भाषांच्या रचनेत, शैलीत, विचारांच्या धाटणीत, शब्दसंग्रहात, व्याकरणात, म्हणीत, वाक्प्रचारात भिन्नता आहे. प्रत्येक भाषेतील विशिष्ट स्वभावधर्म (जोर, वजन, इत्यादी) असतो. शिवाय शब्दांना गर्भितार्थसुद्धा असू शकतो. काळानुसार आणि परिस्थितीनुसार शब्दाचा अर्थ बदलू शकतो. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांच्या काळी भंगार म्हणजे सोनं आणि आता मोड यातोड या टाकाऊ वस्तू. प्रत्येक शब्दामागे विशिष्ट विचार, संकल्पना, भावना किंला संकेत असतो. म्हणूनच रवीन्द्रनाथांच्या क्षुधित पाषाण ह्या कथेच्या शीर्षकाचा अर्थ भारतीय माणसाला समजायला अडचण पडत नाही. पण Hungry stones मध्ये त्या मागच्या सांस्कृतिक संकल्पना पूर्णपणे हरवून जातात.Hunger मध्ये फक्त शारीरिक संवेदना आहे. क्षुधेत एक मानसिक संवेदना आहे. पाषाण ह्या शब्दाचंही तसंच दगड आणि पाषाण हे शब्द कधी वापरायचे ह्याचे संकेत भारतीय संस्कृतीत ठरलेले आहेत. अनुवादक साहित्यबरोबरच संस्कृतीही अनुवादित करत असतो. संस्कृतीत मोडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची योग्यरीतीनं आपल्या अनुवादाच्या भाषेत ओळख करुन देण्याची जबाबदारी अनुवादकाची त्यामुळे अडचणीत भरच पडते. ह्या अडचणींवर मात

करण्यासाठी मी माझे मार्ग शोधून काढलेत. त्यातील एक म्हणजे टिपा. बंगालमध्येच आढळणारा बाउल किंवा ग्राऊंड झिरो ही अमेरिकेतील विशिष्ट जागा ह्यांचा अनुवाद करणार कसा ? आता टिपा ह्या माझ्या अनुवादाचा भागच झाल्यात डॉ. सुजीत मुखर्जींनी गोरा च्या इंग्रजी अनुवादाला परिपूर्ण टिपा जोडल्या आहेत. त्या पाहून माझा मार्ग बरोबर असल्याची मला खात्री पटली. वाचकांना आवश्यक पण टिपांतून देता न आलेली माहिती मी माझ्या मनोगतातून देते. अनुवाद गळती कमी करण्याचे हे दोन उत्तम मार्ग.

आता ज्या देवदास ह्या कादंबरीनं मला हा पुरस्कार मिळवून दिला तिच्या बद्दल थोडसं. ही कादंबरी शरदबाबूंनी त्यांच्या किशोवयात लिहिली असली तरी जवळ जवळ शंभर वर्ष तिनं भारतीय मनावर मोहिनी घातली. पुढील आयुष्यात त्यांनी जे प्रगल्भ, सखोल लेखन केलं त्याची बीजं देवदास मध्ये आढळतात. कुशल व्यक्तिचित्रण करण्यात शरदबाबूंचा हातखंडा होता आणि हे ते अत्यंत मोज या, मार्मिक शब्दांतून करत. शरीरिक वर्णन न करताही त्यांच्या व्यक्तिरेखा जिवंत वाटतात आणि सुस्पष्टपणे आपल्यासमोर उभ्या राहतात. ह्यासाठी देवदास मधील धर्मदास, गाडीवान, द्विजदास, त्याची पत्नी, चुनीलाल, मनोरमा ह्या व्यक्तिरेखा जरुर पाहाव्यात. जमीनदारांपासून नोकरांपर्यंत, पतिव्रतांपासून वारांगनांपर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत विविध व्यक्तिरेखा ते मनोज्ञ रीतीनं रंगवून सजीव करतात. देवदास त्याला अपवाद नाही.

संवादलेखन हे शरदबाबूंचं आणखी एक बलस्थान. देवदास आणि पारु पारु आणि मनोरमा किंवा देवदास आणि चंद्रमुखी ह्यांच्यातील संवाद साधे वाटत असले तरी ते हृदयस्पर्शी आहेत. अशा अर्थपूर्ण संवादातून कथानकाची गुंफण व विकास होतो. ह्यातूनच व्यक्तिरेखांची अंतरंग उलगडतात. मनोदीदी तू भागात सिंदूर भरतेस पण स्वामी कुणाला म्हणायचं हे तुला अजुन कळलेलं नाही हं ! इत या साध्या शब्दांतून पारुनं स्वामी ह्या शब्दामागची तिला अभिप्रेत असलेली संकल्पना स्पष्ट केली आहे.

गरीब अशिक्षित पददलित आणि सामान्य स्त्री - पुरुषांची चित्रणं साहित्यातं प्रथम शरदबाबूंनीच केली. स्त्रियांबद्दल त्यांना अतिशय सहानुभूती होती. त्यांच्या साहित्यातील साध्यासुध्या स्त्रिया वेळप्रसंगी कणखर होतात आणि विलक्षण धैर्य दाखवतात. समाजाच्या चौकटीत राहूनच त्या अन्यायाचा प्रतिकार करतात, प्रसंगी समाज व्यवस्थेविरुद्ध बंडही करतात. पारु आणि चंद्रमुखी ह्या अशा स्त्रियांचं प्रति निधित्व करतात. ह्यातून त्यांना कमाई होते ती दुःखाची पण त्याबद्दल त्यांची तक्रार नसते. ह्या व्यक्तिरेखा वाचकांच्या विचारांचं उन्नयनच करतात.

ह्या वैशिष्ट्यांबरोबरच शरदबाबूंच्या सिद्धहस्त आणि प्रवाही भाषाशैलीनं मला भारावून टाकलं. ही सर्व वैशिष्ट्यं माझ्या अनुवादात आणण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला.'



# फ्रँकफूर्ट बुक फेअरचे स्वरुप आणि भारतीय ग्रंथविश्व

फ्रँकफूर्ट बुक फेअर २००६ साठी भारताची सन्मान्य अतिथी देश म्हणून निवड झाली आहे. फ्रँकफूर्ट बुक फेअर ही मुख्यतः ग्रंथ व्यवसायिकांसाठी असते. ऑ टोबर महिन्यातील पाच दिवसांपैकी पहिले ३ दिवस सामान्य ग्राहकाला प्रवेशच नसतो. रविवार वगळता रोज ही बुक फेअर सकाळी ९ ते संध्याकाळी ६.३० पर्यंत खुली असते. २००४ साली या बुक फेअरला पावणेतीन लाख व्यक्तींनी भेट दिली. त्यापैकी २/३ हे ११० देशांतून आलेले ग्रंथ व्यावसायिक होते. तेथे स्टॉल लावणाऱ्या साडे सहा हजार ग्रंथ प्रकाशकांपैकी सर्वाधिक प्रकाशक इंग्लंड व अमेरिका येथील अनुक्रमे ८६८ व ७१७ इतके होते. भारतातील २९ प्रकाशकांचे स्टॉल होते. शिवाय ७९ देशांनी आपल्या ग्रंथ संपदेची प्रदर्शने लावली होती. ज्या बुक फेअरमध्ये सामान्य ग्रंथग्राहकाला अत्यंत मर्यादित प्रवेश आहे आणि ज्या बुक फेअर मध्ये पुस्तके वाचक - ग्राहकाला विकता येत नाहीत. त्या बुक फेअरमध्ये जगभरचे प्रकाशक धावून भाग का घेतात असा कोणाला प्रश्न पडेल. याचं मुख्य कारण या बुक फेअर मध्ये पुस्तकांच्या वितरणाचे हक्क, भाषांतर रुपांतराचे, चित्रीकरणाचे हक्क यांची मोठ्या प्रमाणावर देव - घेव होते. २००४ च्या फेअर मध्ये सुमारे ६० कोटी युरोंची (४५०० कोटी रुपयांची) उलाढाल झाली. फेअरमध्ये साधलेल्या संपर्कामुळे त्यानंतरच्या काळात जे व्यवहार घडले असतील ते वेगळेच! दुसऱ्या महायुद्धा नंतरच्या काळात फ्रँकफूर्ट बुक फेअर हे ग्रंथद्वारे सांस्कृतिक आदान - प्रदानाचे, एक महत्वाचे केंद्र झाले आहे.

२००६ सालासाठी सन्मान्य अतिथी म्हणून भारताची निवड झाल्यामुळे भारतीय साहित्य प्रकर्षाने जगातील मातबर ग्रंथ व्यवसायिकांच्या नजरेला आणून ते सर्वत्र पोचविण्याची संधी भारताला उपलब्ध होत आहे. १९८६ सालीही अशी संधी मिळाली होती. परंतु त्याचा पुरेसा फायदा भारतीय ग्रंथ जगताला घेता आला नव्हता. पूर्व तयारी म्हणून नॅशनल बुक ट्रस्टने ३० आणि ३१ ऑगस्ट २००५ ला भारतीय प्रकाशक आणि जर्मन प्रकाशक व बुक फेअरचे संचालक यांच्यात चर्चा घडवून आणली.

महाराष्ट्रातून अ. भा. मराठी प्रकाशक संघ व मराठी प्रकाशक संघ या दोनही संस्थांचे अध्यक्ष, मेहता पब्लिशिंगचे अनिल मेहता व सुनील मेहता उपस्थित होते. उर्वशी बुटालियांनी (अभ्यास ग्रंथाच्या व्यवहार) एन्. के. मेहरांनी (शास्त्रीय व तांत्रिक ग्रंथ), बिपिन शहा (चित्रप्रधान पुस्तके) शिरीष राव (बालवाङ्मय) माहिती दिली.

फ्रँकफूर्ट बुक फेअर अथॉरिटीचे संचालक जुर्गेन बुरू यांनी प्रास्ताविक केले. जर्मन ग्रंथ व्यवहाराचे स्वरुप कोणत्या वयोगटांतील लोक विशेष खरेदी करतात अशी सर्व माहिती श्रीमती झील आणि श्री स्ट्रॉसफेल्ड या जर्मन प्रकाशकांनी सांगितली तर भारतीय प्रकाशन व्यवहाराची माहिती मेहरा (शास्त्रीय व तांत्रिक प्रकाशने) राधिका मेनन (मुलांसाठीची पुस्तके) कपूर (चित्रप्रधान पुस्तके) आणि विश्वरसिंग (अभ्यास ग्रंथ) यांनी दिली.

तिसऱ्या सत्रात भारतीय भाषांतून जर्मन मध्ये भाषांतरित झालेल्या पुस्तकांकडे बघण्याचा जर्मन वाचक वर्गाचा रोख काय असतो याबद्दल जर्मन भाषांतरे प्रकाशित करणाऱ्या जर्मन प्रकाशकांनी आपले अनुभव सांगितले.

चर्चेतील काही मुद्दे :

१. अपरिचित समाज आणि त्यांच्या चालीरीती याबद्दल पाश्चात्य समाजात कुतूहल वाढते आहे. हे कुतूहल आता केवळ विक्षिप्त किंवा विचित्र आणि जगावेगळ्या ए सोटिक गोष्टीबद्दलचे कुतूहल नाही.

२. भारतीय कथा व कादंबऱ्यांना वाव आहे. परंतु केवळ गरिबी, जमीनदारशाही यांचे ठराविक चित्रण असणाऱ्या साहित्यपेक्षा प्रत्यक्ष भारतीय माणूस कसा जगतो, वावरतो, विचार करतो याचं चित्रण असणाऱ्या साहित्याचे अधिक स्वागत होईल.

३. गेल्या वर्षात सुमारे २५०० भाषांतरित पुस्तके जर्मनीत प्रकाशित झाली त्यातील फक्त १३९ भारतीय होती. यातीलही बरीचशी मूळ इंग्लिश पुस्तकेच (गॉड ऑफ् स्मॉल थिंग्ज वगैरे) होती. थेट भारतीय भाषांतून जर्मनमध्ये भाषांतरित झालेली जेमतेम ३६ पुस्तके होती. त्यातील फक्त ५ मराठी होती.

४. भारतीय भाषांत प्रकाशित झालेल्या पुस्तकांचे इंग्लिश भाषांतर प्रकाशित झालेले असले तरी जर्मनमध्ये भाषांतर हे मूळ भाषेतूनच करण्याची प्रथा आहे.

५. जर्मन मातृभाषा असलेल्या व्यक्तीने केलेली भाषांतरे अधिक सहजपणे स्वीकारली जातात. सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ् आफ्रिकन, एशियन अॅन्ड लॅटिन अमेरिकन लिटरेचर यांचा तर नियमच असा आहे की जर्मन मातृभाषा असलेल्या व्यक्तीने केलेल्या भाषांतराचाच अनुदानासाठी विचार केला जाईल.

६. जे लेखक पुढे काही काळ निर्मित करत राहू शकतील असे लेखक निवडण्याकडे जर्मन प्रकाशकांचा कल राहील.

७. भारतीय प्रकाशकांची माहिती कशी मिळवायची ही जर्मनांना जाणवणारी महत्वाची अडचण आहे.

८.पुस्तकाचा दोन पानी गोषवारा, कथासूत्र लेखकाची माहिती, त्याला मिळालेली पारितोषिके / पुरस्कार, त्या पुस्तकाची परीक्षणे (कात्रणे) अशी पूर्ण कल्पना देणारे जॅकेट करुन ते सादर करणे अपेक्षित असते.

९. या वर्षभरात जर्मन प्रकाशक भारतीय पुस्तकांची भाषांतरे प्रकाशित करण्यास विशेष उत्सुक आहेत कारण भारत हा अतिथि - देश असल्याचे जाहीर झाले आहे.

१०. नॅशनल बुक ट्रस्ट / साहित्य अकादमी या राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या संस्था आहेत. सर्वच भारतीय भाषांतील साहित्यांतून ते पुस्तकांची निवड करणार. सहाजिकच प्रत्येक भाषेतून फारच थोडी पुस्तके ते निवडतील. मराठी साहित्यातील निवडक पुस्तकांची व्यवस्थित डॉकेटस् तयार करुन ती योग्य त्या प्रकारे योग्य त्या प्रकाशकांकडे / लिटररी एजंटस्‌कडे पोचविण्याचा नेटाने प्रयत्न करायला हवा.

**शरद गोगटे**



# तारकांच्या विश्वात

**पराग महाजनी**

**अमर्याद अवकाशातील अगणित तारेतारकांविषयी सर्वकाही...**




तारकांच्या विश्वात हे खगोलशास्त्रावरील पुस्तक चोखंदळ मराठी वाचकांना विविध तारकापुंजांची ओळख करुन देईल आणि आकाशदर्शनाच्या दृष्टीने प्रारंभिक तयार करून घेईल. हे तसे शास्त्रीय पुस्तक आहे आणि शास्त्रीय परिभाषा वापरून तारकांपुजांची माहिती देते. आकाश निरीक्षण करताना ताऱ्यांची नावे, त्यांचे रंग, दिशा, उदयास्ताच्या वेळा, तारकापुंज, राशी, नक्षत्रे वगैरे गोष्टींची माहिती असणे आवश्यक असते. आपल्या घराच्या गच्चीवरूनही आकाश निरीक्षण करता यावे, अशा प्रकारे एकेका तारकापुंजाची नकाशासकट माहिती देण्याचा उद्देश पराग महाजनी यांनी केंद्रीभूत धरुन तारकांच्या विश्वात या पुस्तकाची रचना केली आहे. आकाशातील विविध तारे व ग्रह आपण बघतो. परंतु त्यांची नेमकी नावे वगैरे आपल्याला माहीत नसतात, काही तारका समूहरुपाने बघितल्यास तयार झालेले आकार तूळ, वृश्चिक, शशक (ससा), लघुसिंह, सरळ बासुकी (पापसर्प), बक, अश्वमुख, ड्रॅगन (कालेय), डोलफिस, हंस, त्रिशंकू, कावळा (हस्त, ध्वांक्ष) पारावत (डोव्ह, कोलुंबा), व्हेल (तिमिंगल), नरतु रंग (सेंटॉरा, मकर, लघु लुब्धक (कुत्रा) श्वात, बृहलुब्धक (ग्रेटर डॉग), शिकारी कुत्रा (श्यामबालक), कर्क, यासारखे दिसतात हे आपल्या पूर्वजांनी ओळखले होते आणि त्यांचे तसे नामकरणही करून टाकले होते. आज तर दुर्बिण वगैरे सहजपणे उपलब्ध असल्यामुळे हे तारकापुंज बघणे आणि ओळखणे आणखीच सुलभ झाले आहे. आकाश निरीक्षणाला प्रवृत्त करणारे, आणि तारकापुंज ओळखायला सहज जमू शकेल असा आत्मविश्वास देणारे तारकांच्या विश्वात हे पुस्तक मराठीत अभूतपूर्वच मानावे लागेल.

तारकापुंजाची माहिती देताना या पुस्तकात वापरलेली पद्धत अत्यंत उद्बोधक आहे. उदाहणार्थ, देवयानी हा तारकापुंज घ्या. युरॅनोग्राफिया या १६९० मधील ग्रंथात

त्याची दिलेली आकृती प्रथम दिली आहे. त्याचे विषुवांश (० तास ३४ मिनिटे), गोलार्ध (उत्तरा), क्रांती (+३९°१५), एकूण क्षेत्रफळ (७२२.२८०), मध्यमंडळावर येण्याच्या वेळा, (तक्ता), त्याचा नकाशा, त्यांची स्थूल माहिती (इ. पाश्चात्य ताव अॅड्रोमेडल, त्याच्याशी संबंधित ग्रीक आख्यायिका (इथोपियाचा राजा सेफेउस आणि राणी कॅसिओपिया यांची कृत्या अॅड्रोमेडा – तिला सौंदर्याबद्दल गर्व तिच्यावर खवळलेल्या समुद्रदेवतेचे इथोपियाचा सर्वनाश करण्यासाठी पाठवलेले सेटूस हे भयंकर श्वापद – अॅड्रोमेडाचा बळी देण्याचा धर्म गुरुंचा सल्ला – मिड्यूझा या दुष्ट राक्षसिणीचे शिर घेऊन पर्स्यूअस या वीराते पेगॅसस या उडत्या घोड्यावरुन समुद्रकिनाऱ्यावर जाऊन सेटूससशी लढून, त्याला हरवले. सेटूसचे शिलाखंडात रूपांतर – अँड्रोमेडाची सुटका), संबंधित भारतीय आख्यायिका (शुक्राचार्यांची कन्या देवयानी – राजकन्या शर्मिष्ठेने तिला तलावात ढकलून देणे – या अपमानाचा सूड म्हणून देवयानीने ययातीशी लग्न झाल्यावर शर्मिष्ठेला दासी बनण्यास भाग पाडणे.. इ.) हे तपशील दिले आहेत. पुढे या तारकापुंजातील ताऱ्यांचे वर्णन दिले आहे. हबल दुर्बिणीने घेतलेल्या निरीक्षणांवरून या सर्पिल दीर्घिकेला दोन केंद्रके असावीत आणि त्या दोहोंच्या दरम्यात प्रचंड कृष्ण विवर असावे हे नवे संशोधन नोंदवले आहे. या दीर्घिकेचा शोध १६१२ साली लागला, पण अरब व हिंदु लोकांना ती आधीपासून ज्ञात होती. या तारकापुंजातील तारे अंधुक आहेत. पश्चिमेकडील चार तारे आयोटा, काप्पा, लॅमडा, प्साय हे फ्रेडरि स ग्लोरी म्हणून प्रसिद्ध आहेत. हा तारकापुंज ययाती परिवारातील एक सदस्य आहे. या तारकापुंजातील तेजस्वी तारे, द्वैती तारे, रुपविकारी तारे, तेजोमेघ आणि दीर्घिका, ग्रहमाला असणारे तारे (उप्सिलॉन पृथ्वीपासून ४४ प्रकाश वर्षे अंतरावर ४.०९ प्रतीचा असणारा हा तारा भोवती फिरणारे तीन ग्रह प्रत्येक ग्रह गुरु ग्रहपेक्षाही मोठा) यांची माहिती देण्यात आली आहे. शेवटी या दीर्घिकेचे छायाचित्र.. अशी सर्व माहिती प्रत्येक तारका पुंजाबाबत दिलेली असल्याने हे तारकापुंज आपल्याला चांगले परिचित होतात, आणि त्यांच्याबद्दल आत्मीयताही निर्माण होते.

**देवयानी या दीर्घिकेचा शोध १६१२ साली लागला, पण अरब व हिंदु लोकांना ती आधीपासून ज्ञात होती.**

अशा ८८ तारकापुंजांची माहिती या पुस्तकात आहे. कन्या, ध्रुव मस्य, सप्तर्षी, वृषभ, वृश्चिक, धतु, शर, मीन, जटायू, ययाती, मधुमक्षिका, मृग, मयूर, तूळ, सिंह, यम, मिथुन, हस, मेष, शर्मिष्ठा, मकर, त्रिशंकू वगैरे तत्वे आपल्या परिचयाची वाटतील. तारकापुंजांची स्थाने लक्षात राहाली म्हणून त्यांचे समूह बसविण्यात आले, आणि एकूण सात कुटुंबामध्ये त्यांचे वर्गीकरण केले गेले. सप्तर्षी, ययाती, शौरी, मृग, स्वर्गीय



जलचर, बायर, लॅकाईल अशी त्यांची नावे आहेत. जोहात बायर आणि निकालेस लॅकॉइल या संशोधल्यामुळे शेवटच्या दोन कुटुंबांना त्यांची नावे देण्यात आली.

या पुस्तकाला दिलेली परिशिष्टेही माहितीपूर्ण आहेत.

१. ताराकापुंजांच्या सीमारेषा प्रत्येक तारकापुंजाच्या सीमारेषांना असणारे तारकापुंज. उदा. देवयानीच्या उत्तरेला शर्मिष्ठा, पश्चिमेला सरठ, नैऋत्येला महाश्व, आग्नेयेला मीन आणि दक्षिणेला त्रिकोण हे तारकापुंज आहेत.

२. पृथ्वीवरील कोणत्या अक्षांशावरुन कोणता तारकापुंज पूर्णतया दिसेल व कोणत्या अक्षांशावरून अजिबात दिसू शकणार नाही. त्याचे कोष्टक.

**पृथ्वीवरील कोणत्या अक्षांशावरुन कोणता तारकापुंज पूर्णतया दिसेल व कोणत्या अक्षांशावरून अजिबात दिसू शकणार नाही. त्याचे कोष्टक.**

३. आकाशातील पहिले ११ मोठे तारकापुंज व त्यांचे क्षेत्रफळ (उदा. वासुकी तारकापुंज सर्वात मोठा. क्षेत्रफळ १३०२°)

४. सर्वात लहान तारकापुंज व त्यांचे क्षेत्रफळ (उदा. त्रिशंकू हा सर्वात लहान तारकापुंज. क्षेत्रफळ ६८°)

५. आकाशातील २१ तेजस्वी तारे. त्यांचे प्रकाशवर्षातील अंतर, भासमानप्रत.

६. आकाशातील द्वैती तारे .

७. सूर्याला सर्वात जवळ असणारे तारे.

८. मेसिए तारकागुच्छ, तेजोमेघ आणि दीर्घिका. (उदा. देवयानीचा मेसिए क्रमांक ११०. NGC क्रमांक २०५ आकार १७ X १० कोनीय मिनिटे, अंडाकृती दीर्घिका).

९. दुर्बिणीची मर्यादा.

१०. महत्त्वाचे उल्का वर्षाव.

११ महास्फोट.

१२. द्विनेत्रीतून आकाशदर्शन.

१३. आकाश निरीक्षणासाठी आवश्यक वस्तू (दुर्बिण, प्लेनी स्फिअर, अॅटेलॉस, द्विनेत्री, ... असलेले भिंग, घड्याळ, वरुन निल कागद लावलेली विजेरी)

१४. महत्त्वाच्या वेधशाळा, खगोलशास्त्रीय संस्था, नियतकालिके, संदर्भग्रंथ)

आपली आकाशगंगा ही सुमारे १ लाख प्रकाशवर्षे व्यासाची महाकाय तबकडी असून ती २०० अब्जतारे, लक्षावधी तेजोमेघ, धूलिकण, पाण्याचे बाष्प आणि विविध प्रकारचे वायू यांच्यापासून बसली आहे.

आपल्या आकाश गंगेसारख्या आणखी कोट्यवधी दीर्घिका विश्वामध्ये आहेत. दररोज नवनव्या दीर्घिकांचा शोध लागत आहे. हे विश्व अमर्याद आहे असे म्हणतात, ते

त्यामुळेच!

आपल्या आकाश गंगेतील दूरदूर वर असणाऱ्या या तारकासमूहांची गटवारी करुन, त्यांचे समूह करुन, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांची व्याप्ती यांचे मोजमाप घेणे. हे सर्व आपल्या पूर्वजांनी कसे केले असेल याचे आश्चर्य वाटते. आज तर आपल्याकडे सुधारित दुर्बिणी वगैरे आहेत, तेव्हा या विशाल आकाशगंगेतील आपल्या चिरपरिचित तारकापुंजांचे, नक्षत्र राशींचे रूप न्याहाळणे हे आपले कर्तव्य ठरते. हे पुस्तक त्यासाठी प्रेरणादायक ठरेल.

पृष्ठे : ३७६ ● किंमत : ३५० रु.● सभासदांना : २६३ रु. ● पोस्टेज : २० रु.


**नोंदणी सुरू!**

**महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वात दीर्घकाळ रणावरची आग सोसणारा रणवीर**

**संभाजी**

**विश्वास पाटील**

**सह्याद्रीच्या निबिड अरण्यांनी, दऱ्याखोऱ्यांनी, खाड्यांनी आणि सागरकिनाऱ्यांनी, उपलब्ध पण दुर्लक्षित सच्च्या कागदपत्रांनी सांगितलेली शिवपुत्राची अद्भुत, चित्तथरारक पण वास्तव महागाथा**

**विश्वास पाटील यांची नवी महाकादंबरी**

**किंमत : ३८०रु.**
**प्रकाशनपूर्व सवलत : २८०रु.**
**सभासदांना : २६०रु.**
**पोस्टेज : ३०रु.**

**ड्राफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवा व आपली प्रत आजच नोंदवा!**

**प्रत मिळण्याची तारीख १ डिसेंबर २००५**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी पुणे ३०. फोन : २४४७६९२४**




## सुखाचा शोध

### वि. स. खांडेकर

**त्याग कुपात्री असेल तर त्याद्वारे सुखाची प्राप्ती होणे दुरापास्तच !**




ज्ञानपीठाचे मानकरी ठरलेले भाऊसाहेब खांडेकर यांची सुखाचे शोध ही कादंबरीही गाजलेली आहे. एकशे दहा पृष्ठांची ही कादंबरी तशी त्यांच्या कादंबऱ्यात सर्वात लहान, कमी विस्ताराची आहे, आणि तरीही वाचकांना झपाटून टाकणारी आहे. या कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे खांडेकरांनी सुखाचा शोध ही चित्रपट कथा प्रथम लिहिली आणि नंतर चित्रपट कथेवरुन कादंबरी लिहिली. देवता या चित्रपट कथेबाबतही असाच प्रकार झाला होता. देवतेमध्ये मध्यमवर्गातल्या स्त्रीचे दुःख त्यांनी रेखाटले. डॉल्स हाऊस, लेडी फ्रॉम दि स्म, वाइल्ड डक वगैरे इब्सेनच्या नाहककृतींची देवेता ला प्रेरणा होती. त्याच धर्तीवर पुरुषाच्या दुःखाविषयी लिहिण्याचे खांडेकरांच्या मनात आले, आणि मध्यम वर्गातल्या कर्तबगार पुरूषाला ही स्वतःच्या कुटुंबाच्या आणि गृहीत कर्तव्य कल्पनांच्या विचित्र दास्यामध्ये कसे अडकून पडावे लागते हे दाखवण्यासाठी सुखाचा शोध ही चित्रपटकथा त्यांनी लिहिली. हा पुरूष कुटुंबासाठी आरंभिलेल्या यज्ञात आपल्या सर्व सुखाची आहुती देतो. पूर्व संस्कारांनी प्रेरित केलेला आंधळ्या त्यागाच्या कल्पनेला चिकटून राहूनही त्याला खरेखुरे समाधान मिळतेच असे नाही. जुनी परंपरागत मूल्ये प्रमाण मानण्याची अंध प्रवृत्ती अशा पुरूषाच्या कुचंबणेला कारण ठरते. जुनी मूल्ये निरर्थक आणि कालविसंगत आहेत हे ठाऊक असूनही, भावनेच्या आहारी जाऊन त्यांचाच बडिवार माजवल्यासे त्याच्या पुरुषार्थाला मर्यादा पडतात. त्यातून त्याच्या वाट्याला जबरदस्त असमाधान येते. परंपरागत आदर्श प्रमाण मातल्याने व्यक्तीच्या तसेच समाजाच्या दृष्टीने अहितकारक आणि अनुचित ठरते, मानवी जीवन ही एक धावती, वाहती, वेगवती अशी महानदी आहे, तिच्या प्रवाहीपणातच तिचे शुचिमत्त्व आहे. तिला बंदिस्त करणे, रोखून धरणे, म्हणजे प्रगतीला खीळ घालणे.. अशी प्रतिमा

खांडेकर वापरतात.

**आंधळा त्याग हा धृतराष्ट्रासारखा असतो, त्याच्या पोटी शंभर दुःखेच जन्माला येतात असे खांडेकर बजावू पाहतात.**

पारंपरिक कौटुंबिक जीवनमूल्यांना कवटाळून राहणे जसे अनिष्ट तसेच कुपात्री त्यागही अनिष्ट असेही खांडेकरांना वाटते. दान सत्पात्री असावे, त्याप्रमाणे त्यागही योग्य कारणासाठी हवा. कोणासाठी किती त्याग करावा हे कोणी ठरवायचे? हे ठरवताना भावनेपेक्षा विवेकालाच अग्रक्रम हवा. कुटुंबासाठी एका व्यक्तीने सर्वस्वाचा त्याग केला किंवा स्वतःचा बळी दिला तरी कुटुंबातल्या इतरांचे कर्तृत्व वाढते का असा प्रश्न खांडेकरांना पडतो. उलट कुटुंबातली माणसे परावलंबी बनतात, समस्येपासून पळ काढून दुसऱ्या कोणाचा बळी देऊ पाहतात, स्वकर्तृत्वाला साद देण्याचे टाळतात, आणि कर्तृत्वाच्या दृष्टीने पंगुत्व स्वीकारणारी ही माणसे मनाच्या दृष्टीने विकृत होतात, असले मिजास खोर गुलाम ज्या त्यागातून निर्माण होतात, तो त्याग व त्यागाची वैचारिक भूमिका सदोष असली पाहिजे असे खांडेकर मानतात.

या कांदबरीचा नायक आनंदा याला कौटुंबिक त्यागाबाबत असा अनुभव येतो, त्याचा त्याग वाळवंटात पडलेल्या पावसाच्या सरीप्रमाणे निरर्थक ठरतो. त्या त्यागानंतर त्याची कौटुंबिक माणसे त्यालाच झिडकारतात. त्याचीच अवहेलना करतात. असला आंधळा त्याग हा धृतराष्ट्रासारखा असतो, त्याच्या पोटी शंभर दुःखेच जन्माला येतात असे खांडेकर बजावू पाहतात.

आनंदाच्या जीवनात दोन स्त्रिया येतात. भावनातिरेक आणि भावनाशून्यता या दोन्ही विकृतींपासून मुक्त असणारी ही उषा ही फार शिकलेली नाही, पण अत्यंत भावनाशील आहे, सहृदय आहे. ज्या कुटुंबाकडून आपला छळ होतो, त्या कुटुंबाचा त्याग करण्याचे धैर्य ती दाखवते. आपल्यावर निरपेक्ष प्रेम करणाऱ्या आनंदाला सावरण्यासाठी ती समाजाचा रोष पत्करायलाही तयार होते. आनंदाच्या जीवनात ती सुखाचे चार क्षण आणते.

आनंदाच्या जीवनात येणारी दुसरी स्त्री माणिक त्याची पत्नी. सुशिक्षित. उच्चभ्रू. उथळ नखरेल. एन विशीत अविवाहित राहून समाजसेवेच्या आणाभाका वाहणारी माणिक पंचविशीत समाजसेवा हे थोतांड मानू लागते आणि नवरा, घर या एकेकाळी तुच्छ वाटणाऱ्या गोष्टींसाठी आसुसते. अर्थात् या तिच्या इच्छा आकांक्षेत काहीच गैर नाही. परंतु तिशीत एक सोयीचा सौदा म्हणून ती लग्न करते आणि फाडफाड बोलणारी, सहा – सात वर्षे मास्तरीण असणारी माणिक आनंदच्या रोमँटिक प्रणयाच्या कल्पनांना साफ धुडकावून जगत राहते. प्रणयाचा उन्माद राहू द्या. त्याचा उत्कट आनंदही तिच्या मुद्रेवर



सहसा दिसत नाही. दिवसभर तिची समाजसेवा चाले. सभा संमेलनात मग्न असे घरातल्या कुठल्याच कामात तिचे लक्ष नसे. सामाजिक कामाच्या पुढे तिला नवरा, प्रेम हे सर्व तुच्छ वाटे. नवऱ्याच्या कुठल्याच कृतीत तिला स्वारस्य नसे. त्यामुळे आनंदला तिचा स्वभाव विचित्र वाटू लागतो, त्याच्या हृदयाला एक प्रकारची शून्यता जाणवू लागते.. आई आजारी असताना चार क्षण तिच्याशेजारी बसायचीही माणिक तयारी दाखवत नाही. उलट वितंडवाद घालते. तिच्या मत्सरामुळे उषाला बोर्डिंगमध्ये ठेवावे लागते, बाळ आणि मीरा यांना देखील हॉस्टेलमध्ये पाठवावे लागते. तिच्या तुटक वागण्यामुळे आनंदाला घर खायला उठते. माणिकच्या शब्दांतला विखार... ... जाता येता सारखे टोमणे मारून हिणवणे, त्या उनाड मैनेबरोबर भटकताना शरम वाटायला हवी होती तुम्हाला पुरूषजात तेवढी लबाड, दुष्ट, कपटी .. बायको म्हणजे काही नवऱ्याची बटीक नाही.. प्रेमच करायचं असतं तर धनंजयसारख्या श्रीमंताच्या मागणीला नकार दिला ... यासारखे तिच्या तोंडचे उद्गार सारखे सारखे ऐकून आनंदाला जगणे असह्य होते. तो अभिनेत्री चंचला हिच्या सहवासात रमतो. मद्याची चव चाखून दुःख विसरु पाहतो. अमेरिकेतून आलेल्या धनंजय बरोबरही चंचलेचे चाळे चालूच असतात.

**पोकळ समाजसेवेच्या आणि अहंकाराच्या धुंदीत मी तुमच्या प्रेमाला लाथाडले. निसर्गाशी वैर करुन, हृदय पायाखाली तुडवले..**

...तेवढ्यात माणिकचे धनंजयला आलेले पत्र त्याच्या पाहण्यात येते... मी आई बनणार आहे. तुझा आधार मला हवा.. धनंजय उत्तर पाठवतो. जगात तत्काळ जीव घेणारी पुष्कळ औषधे असतात. धनंजय चंचलेला घेऊन अमेरिकेला परत जायच्या तयारीत असतो. त्या आधी एका संमेलनाच्या खात्यावरची सगळी रक्कम तो खजिनदार म्हणून काढून घेतो. माणिक संमेलनाची कार्यवाह असते.

माणिक आनंदला एक पत्र पाठवते. आपल्या आयुष्याचा मागोवा घेणारे ती लिहिते, ज्यांचे आयुष्य मी आदर्श म्हणून डोळ्यापुढे ठेवले होते, त्या हेडमास्तरीण बाईनी वयाच्या चाळीसाव्या वर्षी लग्न केले होते, तेही चार मुले असलेल्या आणि पहिली बायको असलेला मनुष्या बरोबर... मी तुमच्याशी, लग्न केले ते मला हक्काचे घर असावे म्हणून ... मालकीण या नात्याने अधिकार गाजवता यावा म्हणून विमा एजंटाशी लग्न करुन मी त्याच्यावर उपकार करतेय या भावनेतून पोकळ समाजसेवेच्या आणि अहंकाराच्या धुंदीत मी तुमच्या प्रेमाला लाथाडले. पुस्तकी जगात, विकृत वातावरणात मी वाढले. निसर्गाशी वैर करुन, हृदय पायाखाली तुडवले.. गेल्या चार महिन्यात मी अंतर्मुख झालेय. त्याग हा प्रीतिमंदिराचा पाया आहे, भोग हा त्या मंदिराचा कळस आहे. पायावाचून कुठलेही

> **त्याग हा प्रीतिमंदिराचा पाया आहे, भोग हा त्या मंदिराचा कळस आहे. पायावाचून कुठलेही मंदिर उभे राहू शकत नाही...**

मंदिर उभे राहू शकत नाही... तुम्ही घरातून निघून गेला तेव्हा माझे डोळे थोडेसे उघडले. पण त्यात धनंजय ते धूळ घातली. .... माझ्या आंधळेपणाचा फायदा धनंजय ते घेतला .. एका चांदण्या रात्री.. तुमच्या विषयीच्या तिटकाऱ्याने मी त्याच्या आहारी गेले... मला दिवस गेले आहेत हे ठाऊक असूनही तो माझ्याकडे येण्याची टाळाटाळ करू लागला. .... मला ब्रह्मांड आठवले. चंचलेचा बंगला सोडून एका साध्या घरात राहून तुम्ही गोरगरिबांची सेवा करु लागलात. हे वृत्त पत्रात वाचून मी संभ्रमात पडले. उषेच्या प्रेमाने तुमचा उद्धार केला हे माझ्या लक्षात आले. ... मी विष पैदा केले.. पण तेवढ्यात कुठून तरी शब्द ऐकू आले... आई..... मी एकटी नव्हते. माझेही जग दोन माणसांचे होते. एक मी आणि दुसरे चार पाच येणारे माझे बाळ... मी ती विषाची बाटली फेकून दिली आणि माणिकचा पुनर्जन्म झाला. आता तिची काळजी करु नका. उषाला मुलगी झाली तर तिचे नाव माणिक ठेवा.. मला मुलगा झाला तर त्यांचे नाव मी आनंद ठेवणार आहे... मुलगी झाली तर उषा....

आणि हा सुखाचा शोध सांगून खांडेकर कादंबरी संपवतात.

आनंद, उषा, माणिक, चंचला आणि आनंदचे बंधू आप्पा, यांच्या आत्मनिवेदनातून या कादंबरीचे कथानक पुढे जाते. आणि एकेकाचे अंतरंगही त्यातून उलगडत राहते. आप्पांना मीरा आणि बाळ ही दोन मुले आहेत. आनंद हा विम्याचे काम करतो. आप्पा खेडोपाडी जाऊन व्याख्याने देतात. जिल्ह्यातला प्रमुख समाज सेवक म्हणून त्यांचे नाव दैनिकात झळकते आणि नगरपालिकेत निवडून आले तर आश्चर्य वाटू नये.. हे सर्व नऊ वर्षात मिळवण्याचे समाधान त्यांना आहे.

१९३० ते १९३९ या दरम्यान घडलेले हे कथानक.. त्यातील मुख्य भर माणिक या सुशिक्षित समाजसेवाप्रवण तरुणीची अहंकारी वृत्ती आणि आनंदशी तिशीत लग्न करुनही त्याच्याशी समरस न होण्याची प्रवृत्ती.. खांडेकरांची माणिककडे पाहण्याची दृष्टी ही तिला पूर्णतया खलनायिका बनवावे इतकी कठोर व टोकाची नाही, चित्रपटात तिला आत्महत्या करायला लावले आहे परंतु कादंबरीत मात्र एक पत्र लिहून ती आपली कैफियत मांडते, आणि शेवटी आपल्या होणाऱ्या बाळासाठी जगायचे ठरवते...

खांडेकरांच्या या साठ – सत्तर वर्षापूर्वीच्या कथानकात आजही वाचकांना स्वारस्य वाटेल. प्रेम आणि त्याग, प्रेम आणि भोग यांच्यातील रस्सी खेच त्यात आहेच, पण त्यापेक्षाही माणिकची व्यक्तिरेखा रंगवताना तिला पूर्णतया दुष्ट, वाईट वा निर्घृण दाखवण्याचे खांडेकरांनी टाळले आहे हे विशेष! आनंद आणि उषा यांच्यातील भावबंध त्यामुळे दृढ



होतात. द्विभार्याप्रतिबंधक कायदा नव्हता त्या काळातले हे कथानक असल्याने माणिक हयात असतानाही आनंदचे व उषाचे लग्न होणे किंवा आनंद हा पती असतानाही माणिकने धनंजयबरोबर अमेरिकेला जाण्याची तयारी दाखवणे याबाबी खटकण्याचे कारण नाही.. आपल्या सर्व चित्रपट कथांमध्ये सुखाचा शोध ही कथा श्रेष्ठ आहे असे सांगणारे वाचक खांडेकरांना खूप भेटले होते... खांडेकर या कादंबरीला भाग्यवान मानतात. कारण ती प्रौढांप्रमाणे तरुणांनाही आवडते आणि आजच्या कुटुंबसंस्थेवर प्रकाश टाकते.

खांडेकरांना तिच्या या वाचकप्रियतेची काही कारणे सुचतात.

१. आजची कुटुंब संस्था ही नकळत कर्त्या तरुणाच्या पायातील शृंखला कशी बनते आहे याचे या कथेतील चित्रण तरुणांना आकर्षक वाटत असावे.

२. या कथेतला प्रेम कथेचा विकास ज्या पद्धतीने केला आहे तिच्यातल्या उदात्ततेकडे वाचकांचे मत ओढ घेत असावे.


चित्रपटात बाबूराव पेंढारकर यांनी वा यावा यांतून आपला मूक दुःखाचे कढ सुंदर रीतीने प्रकट केले आणि मीनाक्षी या नटीने करुण पण प्रेमळ भूमिकेत नायकच्या कामाला मनोहर उठाव आणून दिला. खांडेकरांनी ही कादंबरी बाबूराव पेंढारकर आणि पांडुरंग नाईक यांना अर्पण केली आहे.

या कादंबरीचे लेखन होऊन ७५ वर्षे झाली, नव्या वाचक वर्गाने तिच्याद्वारे सुखाचा शोध घेण्यासाठी सिद्ध व्हावे.

पृष्ठे : १३२ ● किंमत : ९० रु.● सभासदांना : ६८ रु. ● पोस्टेज : २० रु.


नवे कोरे.... नवे कोरे.... नवे कोरे....

# गोल गोल राणी




**स्वाती चांदोरकर**

**वपुंच्या मुलीच्या, वडिलांच्याच संवेदनशील लेखनाचा वारसा घेऊन अवतरलेल्या तरल कथा**

**किंमत १०० रु. सभासदांना ७५ रु. पोस्टेज २० रु.**




# आरोग्यासाठी योग

**अनु. मंगेश कश्यप**

**योग आणि निसर्गोपचार यांचा समन्वय साधून शरीर निकोप व निरोगी राखण्याच्या शास्त्रीय पद्धतींची माहिती**

दि इन्स्टिट्युट ऑफ नॅचरोपॅथी अँड योगिक सायन्स ही बंगलोर स्थित संस्था योगशास्त्र आणि निसर्गोपचार या क्षेत्रात कार्यरत आहे. तिचे विद्यमान अध्यक्ष के. आर. रघुनाथ हे असून योग आणि निसर्गोपचार यांचा समन्वय साधून शरीर निकोप व निरोगी राखण्याची शास्त्रीय पद्धती विकसित करण्याचे प्रयोग करण्यावर त्यांचा भर आहे. आरोग्यासाठी योग या पुस्तकात या संस्थेने योग विषयक भूमिका स्पष्ट करुन, विविध योगिक क्रिया, आसने रूबंध व मुद्रा यांची ओळख करुन दिली आहे. त्या पुस्तकाचे मराठी भाषांतर आता उपलब्ध झाले आहे.

१. योग हे जीवनाचे पूर्ण शास्त्र आहे. त्या द्वारे शरीरातील नैसर्गिक क्रियांना चालना मिळते.

२. नॅचरोपॅथी ही रोग प्रतिबंधक आणि रोग निवारक प्रभावी वैद्यक पद्धती आहे.

३. माणसाच्या जैविक – भौतिक प्रतिसादांचा अभ्यास करून, शरीर आणि मत यांच्यामधील सुसंवाद साधण्यासाठी योगिक क्रियांची मदत घेणे लाभदायक ठरते.

४. शरीरातील विविध अवयव आणि संस्था यांची कार्ये तसेच मन आणि भावना यांचे संतुलन – यात बिघाड वा अंतर निर्माण झाल्यास आरोग्य बिघडते. योगोपचार आणि निसर्गोपचार याद्वारे हे आटो यात आणता येते.

५. या पद्धतीत बाह्य हस्तक्षेप मर्यादित प्रमाणात राहून शरीराच्या वेगवेगळ्या नैसर्गिक क्रियांना चालना मिळते. योगिक क्रिया. योगासने, प्राणायाम याद्वारे ही चालना देणे सुलभ ठरते.

६. योग शास्त्र हे मानवी व्यक्तिमत्त्वाचा वेगवेगळ्या स्तरांवर (शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक) एकात्मिक विकास करण्याचे तंत्र घडवून आणते. त्यामुळे आपली कार्यक्षमता वाढते.



७. योग ही एक जीवनशैली असून ती शरीर, मन आणि बुद्धी यांच्यापलीकडे असलेल्या अविनाशी तत्वाची अनुभूती हे तिचे उद्दिष्ट असते. समत्वम् योगा उच्यते.

**योग शास्त्र हे मानवी व्यक्तिमत्त्वाचा वेगवेगळ्या स्तरांवर एकात्मिक विकास करण्याचे तंत्र घडवून आणते.**

योगासने म्हणजे केवळ काही विशिष्ट प्रकारे शरीराची अल्पकालीन रचना करुन विविध अवयवांना ताण देणे किंवा श्वासोच्छ्वासाचे नियंत्रण नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा (एकाग्रता), ध्यान आणि समाधी अशा अष्टांग योगाद्वारे शरीर आणि जाणीव यांचा समन्वय साधून परम शांतीचा मंगलमय अनुभव घेणे होय. भगवान पंतजली सांगितलेल्या अष्टांग योगामधील योगसाधना ही अहिंसा, सत्य (मनशुद्धी), अस्तेय (अविचलता) ब्रह्मचर्य, अपरिग्रह या सामाजिक आणि तात्विक अनुशासनावर आणि शरीर मनशुद्धी (शौच), तापस, संतोष, स्वाध्याय आणि ईश्वरसमर्पण या व्यक्तिगत शिस्तीवर भर देऊन धारणा (एकाग्रता), ध्यान, समाधी च्या उच्चतर अवस्थे पर्यंत व्यक्तीला नेऊ पाहते. योग ही एक जीवनपद्धती आहे हे एकदा मनावर ठसवले गेले तर आपल्या एकूणच आचरणात, शारीरिक आणि मानसिक कार्य पद्धतीत शिस्त आणि संतुलन प्रस्थापित होते.

योगामुळे होणारे हे फायदेही बहुविध असल्याचे आढळून येते.

१. योगामुळे शरीर सशक्त आणि सुदृढ राहते.

२. आसनांमुळे मुख्य इंद्रिये कार्यक्षम राहतात.

३. चेतातंतू व स्नायू (न्यूरो – मस् युल) आणि चेतातंतू व ग्रंथी (न्यूरो ग्लँड्युलर) या व्यवस्था कुठल्याही ताणतणावाला नियंत्रित करू शकतात.

४. मज्जारज्जूची लवचिकता वाढून रक्ताभिसरण सुधारते.

५. योगामुळे मूळव्याध आटो यात येते. अपस्फित शिरा (व्हेरीकोस व्हेन्स) सुव्यवस्थित राहतात.

६. योगामुळे जठरातील अवयव व स्नायू कार्यक्षम राहतात.

७. योगामुळे जठरातील मंडाचा स्राव वाढतो.

८. योगामुळे रक्तातील शर्करेचे आणि ट्रायग्लिसराई यांचे प्रमाण आटो यात राहते.

९. योगामुळे शरीरात साठलेल्या विषारी द्रव्यांचे निष्कासन होण्यास मदत होते.

१०. योगामुळे शारीरिक थकवा दूर होतो.

११. योगामुळे एकाग्रता वाढते. मन काबूत राहते.

१२. योगाने मनाला स्वास्थ्य लाभते. इच्छाशक्ती दुणावते.

या पुस्तकात योगिक क्रिया, सूर्यनमस्कार, योगासने, डोळ्यांची निगा, श्वसन व प्राणायाम, बंध, मुद्रा, योगनिद्रा यांची माहिती दिली आहे.

१३. योगामुळे आपण निकोप, संतुलित आणि स्वस्थ असल्याचे अनुभवत राहतो.

१४. योगामुळे जीवनाकडे, समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन विधायक राहतो.

साहजिकच, एक आरोग्य संवर्धक प्रणाली म्हणून योग साधनेची उपयुक्तता स्वयंसिद्ध आहे. शरीराला आणि मनाला योग्य स्थितीत ठेवण्याचे काम योगामुळे सोपे होते. रोगनिवारक म्हणून योगाचा वापर करण्याकडे सध्या कल वाढत आहे.

शरीर स्वस्थ राखायचे तर प्रथम शरीर शुद्ध स्वच्छ असायला हवे. शरीरात श्लेष्म, वायू, ॲसिड, घाम, मूत्र आणि मल ही विषारी द्रव्ये बस्ती, माटक, कपालभाती आणि नौली ही षट्कर्मे उपयु त ठरतात. या क्रियांद्वारे विषारी द्रव्ये शरीर व्यवस्थेतून बाहेर पडतात, आणि मोठ्या आतड्याची स्वच्छता होऊन पोट आणि आतडे यांची कार्यक्षमता वाढते.

आरोग्यासाठी योग या पुस्तकात इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपथी अँड योगिक सायन्स ने योगिक क्रिया, सूर्यनमस्कार, योगासने, डोळ्यांची निगा, श्वसन व श्वासोच्छ्वास, प्राणायाम, बंध आणि मुद्रा योगनिद्रा यांची माहिती देण्यात आली आहे. अर्थात विशिष्ट व्याधी आणि शारीरिक तक्रार यांच्या अनुषंगाने कोणती योगिक क्रिया वा आसन उपयु त याचा खुलासाही केलेला आहे.

योगिक क्रिया या प्रकरणात धौती (वस्त्र धौती, वमन धौती), नेती (सूत्रनेती, रबर नेती, जलनेती) कपालभाती, चेहऱ्यावरील वाफ, गुळण्या, लघु शंख प्रक्षालन, डोळ्याचे टॉनिक, त्राटक यांचा ऊहापोह करण्यात आला आहे. या क्रिया करताना काय करावे, काय टाळावे, हे स्पष्ट केले आहे. उदाहरणार्थ, ज्याला जठर किंवा प वाशय यांचा अल्सर आहे, उच्च रक्त दाब, हृदय विकार आणि अंतर्गळ असेल त्याने वर अधौती करु नये ज्यांना नाकातून रक्तस्राव होतो किंवा सर्दी असेल अशांनी सूत्रनेती करु नये. ज्यांना काचबिंदू आहे त्याने त्राटक करु नये. ही षट्कर्मे डोळे, श्वसनक्रिया, अन्ननलिका पोट व आतडी यांची शक्ती वाढवतात. शरीरातील विषारी द्रव्ये अथवा दूषित पदार्थ व्यवस्थेमधून काढून टाकण्यास मदत करतात. त्यामुळे हठयोगामध्ये या योगिक क्रियांना महत्त्व असते.

सूर्य नमस्कारामुळे आसने, प्राणायम आणि व्यायाम या सगळ्यांचा मिळून फायदा होतो. प्लीहा, यकृत, फुफ्फुसे, आतडी, मूत्रपिंड यांना व्यायाम मिळतो. मधुमेह, ब्राँकायल अस्थमा, बद्धकोष्ठता, अनियमित पाळी यात फायदा होतो.

आसने हा योगाचा मूलभूत भाग आहे. आसने मुख्यतः अंतस्रावी आणि चेतासंस्था यावर काम करतात. आसने आणि व्यायाम यात फरक आहे.



आसने शरीरात ताकद साठवतात, व्यायामात ताकद वापरली जाते. व्यायामानंतर थकवा जाणवतो. तर आसनानंतर प्रसन्न व उत्साही वाटते. आसनांमुळे शरीराची लवचिकता वाढते. व्यायामाने शरीर टणक बनते. आसने नेहमी एकाग्र चित्ताने आणि सावकाश करायला हवीत. हात व पाय जेव्हा गुरुत्वाकर्षणाविरुद्ध जातील (जमिनीपासून वर) तेव्हा श्वास घ्यायचा असतो. आणि पूर्वस्थितीत येतील तेव्हा श्वास सोडायचा असतो. अर्ध हालासन, अर्ध पवन मुक्तासन, उत्तान, ताडासन, कडिचलन, पर्वतासन, वक्रासन, गोमुखासन, श्वासन, सेतुबंधासन, हस्त पार्श्वासन, मास्यासन, भुजंगासन, मंडुकासन, सुप्तवज्रासन, धनुरासन, शशांकासन, शीर्षासन वगैरे आसनांच्या कृती आणि पथ्ये सांगण्यात आली आहेत. बसून, उभे राहून, पालथे पडून वा उताणे पडून ही आसने केली जातात.प्राण म्हणजे सर्व जीवांच्या मुळाशी असणारी ऊर्जा.

आसने शरीरात ताकद साठवतात, व्यायामात ताकद वापरली जाते. व्यायामानंतर थकवा जाणवतो. तर आसनानंतर प्रसन्न व उत्साही वाटते.

या ऊर्जांना प्राण, अपान, समन, उदान आणि व्यन ही नावे आहेत. प्राण छातीच्या भागात कार्य करते. श्वसनक्रिया उद्युक्त करणारा श्वास म्हणजे प्राण. त्याचे वास्तव्य हृदय आणि फुफ्फुसे यात असते.

अपान जठराच्या खालच्या भागात, नाभी आणि गुदद्वार यांच्यामध्ये वावरतो. अपान शरीरातून टाकाऊ पदार्थांचे उत्सर्जन करण्यास मदत करतो. रक्तस्राव, प्रसूतिवेदना, प्रसूती, पोटदुखी व रेत याला अपान कारणीभूत असतो. समन हा हृदय व नाभी केंद्र या दरम्यान वाहतो. त्यामुळे जठराग्नी प्रकोपतो पचनक्रियेवर नियंत्रण ठेवून प्राण आणि अपान यांच्यात सन्तुलन राखतो उदान हा घसा, कंठ, नाक व जीभ यांच्यावर कार्य करतो. व्यन हा संपूर्ण शरीरभर वावरतो. आहार श्वसनाद्वारे मिळणारी ऊर्जा तो लसिका आणि मज्जा रज्जू यांच्याद्वारे शरीरभर वितरित करतो. योगाचे शास्त्रीय आणि चिकित्सा विषयक अंग म्हणजे प्राणायाम. श्वास व उच्छवास यांच्या गतीचे नियंत्रण करणे, जीवन विषयक ऊर्जा टिकवून धरणे हे त्याचे कार्य.

प्राणायामात पूरक (श्वास आत घेणे) कुंभक (श्वास रोखून धरणे) रेचक (उच्छ्वास) या तीन मुख्य क्रिया येतात. प्राणायामामध्ये जालंधर, मूल आणि उड्डियान यासारखे बंध महत्त्वपूर्ण आहेत. कपालभाती, नासिका, सूर्यभेदन,चंद्रभेदन याद्वारे शुद्धीकरण होऊन श्वसन प्रचन संस्थात चयशक्ती यांचे कार्य सुधारते.

जालंधर बंध, मूलबंध आणि उड्डीयान बंध हे बंधाचे तीन मुख्य प्रकार असून प्राणायामाच्या सरावा दरम्यान ते केले जातात. चेतासंस्थेला मसाज करून इडा, पिंगला

आणि सुषुम्ना या नाड्यांचे कार्य सुरळीत चालावे यासाठी ऑसिजनचे संतुलन सांभाळण्यास बंध मदत करतात.

मुद्रा म्हणजे हावभाव, ज्ञानमुद्रा, खेचरी मुद्रा, अश्वीनीमुद्रा, योगमुद्रा, महामुद्रा, तडागीमुद्रा, पशिनीमुद्रा, विपरीत करणीमुद्रा इत्यादी मुद्रा शरीराच्या विविध इंद्रियांच्या कार्यक्षमतेला चालना देतात. योगनिद्रा संपूर्ण शरीराला व मनाला आराम देण्यासाठी प्रभावी माध्यम ठरते.

बद्धकोष्ठता, अपचन, निद्रानाश, यकृताचे विकार, डोकेदुखी, दमा उच्च रक्तदाब, मधुमेह, संधिवात, मूत्रपिंड, कोलायटिस, त्वचारोग, ॲसिडिटी, स्मरणऱ्हास, मायोपिया वगैरे २५ व्याधींवर योगिक क्रिया आसने व प्राणायाम याद्वारे काय उपचार होऊ शकतात. तेही या पुस्तकात शेवटी देण्यात आले आहे शास्त्रशुद्ध योगसाधनेचे रहस्य उलगडून दाखवणारे हे पुस्तक आपल्याला मानसिक - शारीरिक स्वस्थतेचा आनंद कसा मिळवावा यांचा अचूक मार्ग दाखवील.

पृष्ठे : १०० ● किंमत : **८०** रु.● सभासदांना : **६०** रु. ● पोस्टेज : **२०** रु.


## उत्तम आरोग्यासाठी मार्गदर्शक पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **हृदयविकार निवारण** | शुभदा गोगटे | १८० |
| **चाळिशीनंतरची वाटचाल** | डॉ.सुभाष दांडेकर | १०० |
| **सुखद मातृत्व** | डॉ.रत्नावली दातार | ७० |
| २० मिनिटे तंदुरुस्तीसाठी :शेली बात्रा | अनु.गंगाधर महाम्बरे | १३० |
| **डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी** | डॉ. विकास / विनिता गोगटे | २५० |
| बाळाचे आरोग्य | डॉ.अविनाश गोखले | ५० |
| बाल परिचर्या | सुधा पाटील | १८० |
| **मधुमेह : एक आव्हान** | डॉ.अरुणा/अशोक जैन | १२० |
| **हसता हसता आरोग्य** | अनु.दिगंबर गाडगीळ | ९० |
| **पाणी :**एक अद्‌भुत उपचारपद्धती | अनु.सुभाष जोशी | ७० |
| **भारतवैद्यक** | डॉ. शाम अष्टेकर | ६०० |
| **एकच पेला शिवाम्बूचा** | डॉ. शशि पाटील | ९० |
| **कर्करोग असाध्य नाही** : ए.एन.भिसे | अनु. राम दातार | ५० |
| **आपले सौंदर्य आणि त्याची निगा** | अनु.मीना टाकळकर | १०० |
| **रेकी** | शुभदा दामले | ६० |

**सभासदांना २५% सवलत**




## चित्तचित्रे

**संपादन : अरुण शेवते**




### स्वप्नांचे विश्व उलगडणारे अनोखे लेखन

विश्वात वावरणाऱ्या काही अदृश्य पण प्रभावी शक्ती आहेत आणि त्या स्वप्नांतून काही मार्गदर्शन करु शकतात हे जाणवण्या एवढी मनाची शक्ती वाढवू शकतो का असा प्रश्न ... विचारतात.

प्राचीन धर्मग्रंथांमधून स्वप्नांचे अनेक संदर्भ येतात. स्वप्नांचा अर्थही कोठे कोठे स्पष्ट केलेला दिसतो. धर्माचा संबंध पार लौकिक सृष्टीशी असल्याने स्वप्नांचे अर्थ ज्योतिष ग्रंथांत दिले जात असावेत. स्वप्ने भविष्य सूचक असतात. शुभ्र वस्तू, सवाष्ण स्त्री, सूर्यचंद्र, रत्ने, समुद्र, फळे इत्यादी स्वप्ने शुभसूचक तर राक्षस, स्मशान, काळोख, र त, वगैरे स्वप्ने अशुभ सूचक मानले जाते. अशी माहिती ज्योतिर्भूषण जयंतराव साळगावकर देतात आणि आपल्या काही स्वप्नांच्या कहाण्या सांगतात. गूढ शक्ती, देवधर्म यांची बालपणापासून जिज्ञासा असणारे साळगावकर सावंत महाराजांना विचारतात, मेले त्याला जिवंत करण्याचा मार्ग कोणता? तेव्हा त्यांनी आपले गुरू साटममहाराज यांनी स्वप्नात मृत माणसाला जिवंत करून दाखवण्याची पद्धत दाखवली होती, त्या पद्धतीने आपण एका मृतदेहात जिवंत केले असा खुलासा केला अशी आठवण दिली आहे. स्वप्न सृष्टीतून सहकार्य मिळते, मार्गदर्शन मिळते याचेही अनुभव साळगावकर देतात.

मी कवी असल्याने माझ्या बाबतीत अंतर्मनाचा व्यापार ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते.. मला स्वप्नं सतत पडत असतात असे निः संदिध शब्दांत मंगेश पाडगावकर स्पष्ट करतात. अंतर्मनाचा जो व्यापार स्वप्नात आकार धारण करतो तो आकार प्रत्येक वेळी वर्णनाच्या आवा यातला असतोच असे नाही, हाही त्यांचा अनुभव आहे, तरीही माझ्या अंतर्मनातील खोल खोल अशा असुरक्षिततेच्या भावनेचा आणि त्याचंच रुप असलेल्या भीतीचा साक्षात संबंध आहे. अशी कबुली ते देतात. प्रत्यक्षातल्या प्रमाणे स्वप्नातही

**ती स्वप्नं आली कुठून ? त्यापैकी काही स्वप्नंच तेवढी स्मरणात का राहिली? उरलेली विस्मृतीत का गेली? ....**

कविता लिहिण्याचे त्यांना आठवते. जणू कुणीतरी आपल्यासाठी ती कविता लिहून ठेवलेली आहे. इतकी सहजपणे ती नंतर कागदावर उमटते. एम. ए. ची परीक्षा झाल्यावर कुलदेवता शांतादुर्गा त्यांच्या हाती सुवर्णपदक ठेवतेय असे एक स्वप्न... ते पुढे प्रत्यक्षात येते!

बंगल्याकडे येणारी वाट .... पायवाटेवर वाळू.. फाटका खालचा भाग मात्र तिथं गवत नसूनही हिरवा.. अंगणात मोरपिसं अस्ताव्यस्त विखुरलेली. तेवढ्यात सूर्य उगवतो. मोरपिसातले सप्तरंग झळाळून उठतात. त्यातलं एक पीस मनगटावर फिरवत असताना पक्ष्याचा फडफडण्याचा आवाज... जाग... मनगटावर मात्र दिवसभर जाणवणारा मुलायम स्पर्श... हे स्वप्न प्रकाश नारायण संत यांच्या लयेताचा दुसरा कालखंड सुरु करणारे........या लोभस व्यक्तिरेखेच्या निरागस छटांनी या पुढच्या काळात बहरत गेले. वनवास या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले.. स्वप्ने सूचक असतात यावरचा विश्वास त्यामुळे दृढ होतो. लहानपणापासून आपल्याला असंख्य स्वप्नं पडली आहेत, पण त्या स्वप्नांवर आपला कपमात्र ही अमंल नव्हता. ती स्वप्नं आली कुठून ? त्यापैकी काही स्वप्नंच तेवढी स्मरणात का राहिली? उरलेली विस्मृतीत का गेली? .... झोपेत स्वप्नात व्यक्त होणाऱ्या अबोध मनावर आपला ताबा नाहीच... अशी असहायतेची जाणीव मंजुषा गोसावी यांनी प्रकट केली आहे. आपण कुठंतरी जात आहोत, पण उशीर झाल्याने वेळेवर पोचण्यासाठी जिवाची उलघाल होत आहे. असे एक स्वप्न आणि परीक्षाजवळ आलेली आहे, अभ्यास नीट झालेला नाही, परीक्षेत उत्तर लिहिण्याचे भय वाटते आहे हे दुसरे स्वप्न ही नेहमी पडणारी दो.... स्वप्ने मंजुषा गोसावींना सतावत आली आहेत. जागृतावस्थेतला असंख्य बंधनांची सुप्तावस्थेतील स्पंदने म्हणजे स्वप्ने अशी व्याख्या त्या करतात. स्वप्न ही प्रत्येकाची आत्यंतिक वैयक्तिक बाब आहे, या संकल्पतेची मीमांसा करण्याच्या नावावर काही भोंदू कमाई करू पाहतात याबद्दल त्यांना चीड आहे.

स्वप्न आणि सृजन या दोहोंचा जन्म अबोध मनात होतो, स्वप्नाची देणगी फक्त मानवालाच लाभलेली आहे का? निद्रा आणि अर्ध जागृती अशा सीमारेषेवरच्या दुनियेतील ही शक्ती म्हणजे मानवाला मिळालेली एक मोठी देणगी आहे अशी भावना चित्रकार शि. द. फडणीस व्यक्त करतात.

कथाकार शांताराम यांना आपण देशाचे पंतप्रधान झाल्याचे आणि दोन दिवसातच राजीनामा दिल्याचे स्वप्न पडले. इत या तडकाफडकी राजीनामा का ? तर म्हणजे



साधे पान खाऊन कुठेही पिचकारी टाकण्याचे स्वातंत्र्य या पदावरच्या व्यक्तीला नाही इतका कडेकोट बंदोबस्त!

**स्वप्न म्हणजे शब्दविण प्रकट होत राहिलेली मानववंशाची प्रतीकांची भाषा होय.**


ज्योतिषशास्त्राच्या जाणकार आणि सिद्धीविनायकाच्या विश्वस्त वसुधा वाघ यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी येणारे लोक अनेकदा आपली स्वप्नेही सांगतात, त्यांच्या मते प्रत्येक माणसाकडे दिव्य दृष्टी असते आणि ती भक्ती ज्ञान पुण्यकर्माने जागृत होऊन माणसाला सावध करीत असते.. आगामी स्थित्यंतराबद्दल ती पूर्व कल्पना देते... शुभयोगात गुरु, रवी, मंगळ, शनी असताना पडणारे क्रांतिकारक स्वप्ने खरी ठरतात. अनेकांच्या स्वप्नात मृत व्यक्ती येऊन भावी घटनांची कल्पना देतात, त्या घटनेतील दुःखाची तीव्रता क्षीण करतात. स्वप्नांच्या मदतीने होमिओपॅथीचे उपचार या लेखात डॉ. आनंद पानसे यांनी पेशंटला पडणाऱ्या स्वप्नांच्या लक्षणकोषावरुन त्यासाठी कोणती औषधे वापरली याविषयाचे विवेचन केले आहे. भावनिक लक्षणे बौद्धिक लक्षणे सुप्त मनाची लक्षणे हा नियम लक्षात घेऊन, होमिओपॅथीमध्ये तुम्हाला कोणती स्वप्ने पडतात असा प्रश्न न चुकता विचारला जातो. स्वप्न म्हणजे शब्दविण प्रकट होत राहिलेली मानववंशाची प्रतीकांची भाषा होय. शेकडो स्वप्ने आणि ती स्वप्ने असलेली औषधे यांची लक्षण कोषात नोंद सापडते.

दत्तात्रय अत्रे यांनी अक्कलकोटचे स्वामी स्वप्नात आल्याची हकीकत दिली आहे. सतत तीन महिने ते स्वप्नात येत होते. प्रत्यक्ष अक्कलकोटला गेल्यावर त्यांचा आशिर्वाद मिळाला. त्यांनी उपासना दिली. त्यामुळे पुढे भरभराट होत राहिली. आमचा कृपावर्षाव आहेच. आपण पात्र व्हायचं ठरवा असा स्वप्नाद्वारे ते तगादाही करत असतात म्हण!

पृष्ठे : **१२४** ● किंमत : **९०** रु.● सभासदांना : **६८** रु. ● पोस्टेज : **२०** रु.

## स्वप्नी जे देखिले

अभिनेता देव आनंद पंचाऐंशीचा टप्पा ओलांडून पुढे गेले आहेत, तरीही सतत कामात असतात. एक क्षणही वाया घालवत नाही. सतत क्रियाशील राहिल्यानेच आपण तरुण राहतो असे ते मानतात. आणि प्रिय व्यक्ती, पुस्तके, संगीत यांच्या सहवासात ते आनंद मानतात. पण तेही स्वप्नं बघतात. त्यालाही स्वप्नं पडतात. या स्वप्नात परिचित गोष्टी, परिचित व्यक्ती येतात तशाच कधी न बघितलेल्या अपरिचित, अज्ञात गोष्टीही येतत. दर रोजच्या आपल्या जगण्याच्या संदर्भातून स्वप्ने आपली जागा शोधत असतात. आणि त्यामुळे स्वप्नात अनेक चित्रपटांची दृश्ये त्यांना दिसतात. सुचतात. त्या स्वप्नांत गुंतून राहणे मात्र देवआनंदला आवडत नाही. झोपेतला स्वप्नाशी आपले काही घेणेदेणे




नाही, जाग आली की ती स्वप्ने संपतात आणि जगणे सुरु होते. अशी त्यांची भावना आहे, आणि तरीही आयुष्यात बघितलेली अनेक स्वप्ने पूर्ण झाल्याचे समाधानही त्यांना वाटते.

दीप्ती नवल या अभिनेत्रीला फक्त श्वेत धवल (ब्लॅक अँड व्हाइट) स्वप्नेच पडतात म्हणे! रंगीबेरंगी स्वप्ने तिला दिसतच नाहीत. आपल्या स्वप्नांचे रंगच कोणी म्यूट करुन टाकलेले आहेत असे तिला वाटते. तिला एक नेहमी दिसणारे स्वप्नदृश्य आपण प्लॅटफॉर्मवरुन धावतोय आणि ट्रेन पुढे धावतेय् ती काही पकडता येत नाही. अशा स्वप्नाचा अर्थ कसा लावायचा असा तिला प्रश्न पडतो.

भविष्यात घडणाऱ्या गोष्टींचे पूर्व संकेत स्वप्नातून कधीच मिळाले नाहीत असे दीप्ती नवलचे म्हणणे आहे. स्वप्नातही आपण ॲटिंगच करतोय असे तिला वाटते. स्वप्न म्हणजे आपणच आपल्या मनाशी केलेला संवाद.. स्वतःशीच स्वतःच नातं जोडण्याचा पूल म्हणजे स्वप्न. पूर्वजन्म व पुनर्जन्म यांच्यातील दुवा... आपल्या दडपून टाकलेल्या भावना (मग त्या पूर्व जन्मातल्या असोत वा चालू जन्मातला असोत, स्वप्नातूनच व्यक्त होतात असेही दीप्तीला जाणवते.

कवी दिग्दर्शक गुलजार यांचा ठाम विश्वास आहे की स्वप्न कधीच खोटं नसतं. ते कुठल्या तरी विशिष्ट पातळीवर आपल्या जाणिवेतून, आपलाया अनुभवातून जन्माला आलेले असते. त्यामुळे स्वप्नात घडलेल्या घटना कदाचित खोट्या असतील, पण स्वप्न खोटं नसतं. स्वप्नांना फॅन्टसीचा मोहक चेहरा असतो. सत्य आणि कल्पनारंजन यांची बेमालून सरमिसळ त्यात झालेली असते. स्वप्न हे कवितेसारखं असतं. अस्सल जीवनानुभव फॅन्टसीच्या नजरेतून व्यक्त करणं हे काम कविता आणि स्वप्न दोघंही करतात. स्वप्नं आपल्याला दिलासा देतात. मनातल्या ताणाचा निचरा करतात, ह्यावरचं ओझं कमी करतात. मौसम सिनेमाचा लायमॅ स गुलजारना असाच स्वप्नात सुचला. अक ही ख्वाब कई बार देखा हे मैंने यासारख्या गीतांतूनही स्वप्नदृश्याला शब्दरुप लाभले आहे. स्वप्नांचीच माझे आयुष्य घडवले आहे. आयुष्यातला सगळ्याच घडणाऱ्या गोष्टी मी स्वप्नात पाहिल्या आहेत. मी म्हणजे एक स्वप्नाचं घर आहे. स्वप्नातच मी एक वेगळे जग बघतो. आयुष्यातील असुरक्षितता म्हणजे स्वप्न... असे अली पीटर जानचे मत आहे. स्मिर नॉफ व्होडकाची बाटली प्याल्यावर विचित्र स्वप्ने भंडावून सोडतात असाही त्यांचा अनुभव आहे.

बायबलमधील काही स्वप्ने आणि त्या संदर्भातील कथा लक्षात घेतल्या तर स्वप्नातून



मिळालेल्या संकेताप्रमाणे काही घटना घडून येतात असा निष्कर्ष काढता येतो असे फादर फ्रान्सिस दीब्रिटो यांचे प्रतिपादन आहे. प्रोषितांचे कार्य या पुस्तकात दोन ठिकाणी स्वप्न हे दैवी दर्शन देऊन नवजात येशू ला व त्याच्या आईला घेऊन इजिप्त मध्ये जायला सुचवले. मारियाचा पत्नी म्हणून स्वीकार कर, तिच्या पोटी देवाच्या आत्म्याद्वारे गर्भ राहिला आहे असे प्रभूचा दूत योसेफला स्वप्नातच आदेश देतो.

**स्वप्ने पाहताना कधी मौज वाटते, कधी धास्ती ! कधी मन सुखावते कधी भयाने दडपून जाते.**

कविवर्य शंकर वैद्य यांना स्वप्नांद्वारे अनेक कविता सुचलेल्या आहेत. स्वप्न म्हणजे मनाची एक क्रीडा, ती अत र्य स्वरुपाची मनोक्रिडा असते तशी आणि अबोध, अप्रकट रुपात अस्तित्वात असलेला अनुभवांचे चमत्कार पूर्ण असे स्वरुप म्हणजे स्वप्न असे वैद्यांना वाटते. स्वप्ने पाहताना कधी मौज वाटते, कधी धास्ती ! कधी मन सुखावते कधी भयाने दडपून जाते. अद्भूत, विपरित, विस्मयकारक, अघटित, अत र्य, अविश्वसनीय अजब अशी अनेक विशेषणे त्यांच्या डो यात गर्दी करतात. स्वप्नात कविता रुपाने जाणवलेल्या काही अनुभवांचाही ते उल्लेख करतात. त्याचबरोबर स्वप्नातील भावानुभव उभा करण्यासाठी कवीजवळ तल्लख स्मरणश ती असावी लागते. त्याचबरोबर कला दृष्ट्या तो योग्य प्रकारे मांडण्याची गुणवताही आवश्यक असते.

स्वप्नातील अनुभवाला एक प्रकारचा मु तपणा असतो. वास्तव जीवनातल्या स्थलका...च्या, निसर्ग नियमाच्या रीतिरिवाजांच्या मर्यादांना त्यात स्थान नसते.. व्यक्ती, वस्तू यांची रुपे स्वप्नात वेगळी होऊन येतात. त्यामुळे त्यात चमत्कारिकपणाचाही भाग डोकावतो त्यामुळे कधी कधी स्वप्नाच्या काही भागाचा अर्थही कधी कधी नीट लागत नाही.

शिरीष पै या कवयित्री आणि लेखिका. आपल्या स्वप्नावर आपला ताबा नसतो, स्वप्नात जे घडते त्याचे आपण फक्त साक्षी असतो, आणि ते स्वप्न साक्षीभावाते बघतही असतो. मनी वसे ते स्वप्नी दिसे. अशी म्हण आहे. मनातील अमर्याद स्मृतींच्या साठ्यातील कोणत्या तरी घटनांना किंवा भविष्याला हातात घेऊन स्वप्नांचा खेळ खेळणारी ही कोणती अज्ञात शक्ती आहे, आणि ती आपल्या झोपेतच जागी होऊन स्वप्नांची क्रीडा का मांडते हे गूढ त्यांना सतावते आहे. आपणच आपल्या स्वप्नांचे शिल्पकार असतो का? शिरीषताईंच्या स्वप्नात आपले आई वडील आणि नातलग, साहित्यिक मित्र, अमिताभ बच्चन सारखे कलावंत, पांडिचरीच्या माताजी, ओशो, शिडीचे साईबाबा... अशा ज्ञात व्यक्तींचा संचार होताना जाणवतो. स्वप्नात पाणी,

> **स्वप्न पडणं ही एवढी अद्‌भुत सुंदर गोष्ट आहे की तिच्यामधून अर्थ शोधून काढण्याचा अरसिक उद्योग कशाला करायचा?**

महापूर, अपघात स्मशानात पेटलेली चिता वगैरे दिसल्यावर तशा काही घटना घडल्याचाही त्यांचा अनुभव आहे. स्वप्नात आपण कधी कोणावर प्रेम केले असेल ते आयुष्यात ज्याच्यावर प्रेम आहे त्याच्यावरच अन्य कोणावर नाही असाही निर्वाळा त्या देतात तेव्हा त्या किती ग्रेट आहेत याविषयी वाचकांची खात्रीच पटते! शंभर टक्के! स्वप्न ही मानसिक स्वास्थ्यासाठी निसर्गाने केलेली काहीतरी व्यवस्था असावी हा त्यांचा सिद्धातही त्यायोगे विचारांना चालना देणारा ठरतो.

प्रतिभा रानडे यांचे दीप्ती नवलच्या अगदी उलटे आहे. त्यांना स्वप्ने बहुतांशी रंगीतच पडतात. स्वप्न पडत असतं तेव्हा ते खरंच वाटत असते, ते आपण जगत असतो. तेवढ्यापुरतं तेच आपलं वास्तव असतं... काहीवेळा त्यातून भविष्याची चाहूल लागते. आपल्या आईला पडलेल्या काही स्वप्नांवरुन तसे त्यांना अनेकदा जाणवले. नवसाबद्दल आईची अंतःप्रेरणाच तिला स्वप्नरुपाने दिसली असावी अशी त्यांची भावना आहे. स्वप्न पडणं न पडणं हे आपल्या हातात नसतंच. ती पडायची तेव्हा पडतात. वाईट स्वप्नं इच्छा नसतानाही पडतात. स्वप्न ही मनाची एक वेगळीच शक्ती असावी.

फ्राइडने स्वप्नांचा अन्वयार्थ लावणारा ग्रंथ लिहिला. परंतु त्यात माणसाच्या लैंगिकतेवर भर असल्याने ते विवेचन एकांगी ठरते असे प्रतिभा रानडे यांना वाटते. स्वप्नांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न अत्यावश्यक आहे. असे त्या मानतात. ग्रेसच्या कवितांसारखा अशा स्वप्नांचा फक्त आनंद घ्यायचा. त्यातील शब्दशब्दातील अर्थ शोधण्याच्या धडपडीत दमछाक कशाला करुन घ्यायची? एखाद्या बेसावध क्षणी काहीतरी कळूनच जातं. तेवढंच पुरेसं असतं. स्वप्न पडणं ही एवढी अद्‌भुत सुंदर गोष्ट आहे की तिच्यामधून अर्थ शोधून काढण्याच्या झटापटीचा अरसिक उद्योग कशाला करायचा?... आपल्या मनातील अनामिक भीती, ताजेपणा, कोवळेपणा, उत्कंठा, अद्‌भुताची ओढ हे सगळं आपली स्वप्नंच जपत असतात.

पृष्ठे : **१२८** ● किंमत : **९०** रु.● सभासदांना : **६८** रु. ● पोस्टेज : **२०** रु.





# साधंसुधं...

## रुपेरी

**प्रमोदिनी वडके - कवळे**

.... आपण (कसेबसे का होईना पण) मॅट्रिक पास झालो त्याला बघताबघता २५ वर्षे पूर्ण झाली. आपला अकरावी अ चा वर्ग त्याने जिंकलेल्या स्पर्धा, केलेल्या मारामाऱ्या, खोड्या हे सगळं अजून जसंच्या तसं आठवतंय ना? त्या आठवणीला उजाळा देण्यासाठी आता एक रुपेरी स्नेहसंमेलन करुयात. दोन दिवसांचं. कशी वाटते आयडिया? आपल्याच गावात, आपल्याच शाळेत जमूयात सगळे. कोणतीही सबब न सांगता, आपापल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून सगळ्यांनी हजर राहणं कंपलसरी आहे. आणि हो! कधी, कसे येताय? गावात राहण्याची काही सोय आहे किंवा नाही? हे आधी कळवायचं. म्हणजे तशी सोय करता येईल. पत्र अर्थातच आपल्या मॉनिटकडेच पाठवायचं. त्याचा पत्ता आहे....

अनपेक्षितपणे आलेलं ते पत्र वाचताना माझ्या डोळ्यासमोर पंचवीस वर्षापूर्वीचा तो कोवळा, गाभुळल्या चिंचेच्या आंबटगोड चवीचा काळ उभा राहिला. मग सगळ्या वर्गसोबत्यांना भेटायला आतुर झालं. पुनः पुनः मी त्या आमंत्रणाचं पारायण करत राहिले. त्या पत्रातला तो रुपेरी स्नेहसंमेलन शब्द माझ्या मनातली एक गंमतशीर आठवण जागवून गेला.. माझ्या धाकट्या भावाच्या शंकाचं तर्कशास्त्र मोठं अजब होतं. दारावर लाकडाच्या मोळ्या किंवा डिंक, जांभळं, करवंद असा रानमेवा विकायला आणणाऱ्या कातकरणींच्या अंगावर चांदीचे जडजड दागिने असायचे. त्यामुळे त्याला वाटलं चांदी हा गरीबांचा धातू असावा. त्याने एकदा आजीला विचारलं, आपले देव पण गरीब आहेत का ग? तुला असं का वाटलं बाबा? आजीच्या मनात आम्हां भावंडाच्या विचारशक्तीचा धसकाच होता. त्याच्या पूजेला आपण चांदीची भांडी वापरतो ना म्हणून. संतोषचं भाबडं उत्तर. त्यावर आजीने दिलेलं स्पष्टीकरण फार छान होतं. माझ्या ते अजूनही लक्षात आहे... चांदी म्हणजे सर्वसामान्यांचा धातू त्याला चमक असते, पण ती सोन्यासारखी श्रीमंती, तीक्ष्णपणे डोळ्यात घुसणारी, डोळ्यांना खुपणारी नसते. चांदीच्या तेजात एक सौम्य मृदू भाव आहे. ज्याने पहाणाऱ्याचे डोळे दिपत नाहीत. म्हणून चांदीच्या दागिन्यांचं कधी ओझं

वाटत नाही. देवपूजेला चांदीची भांडी वापरली जातात कारण ती शुद्धीकरण करतात. वैभवाचा बडेजाव मिरवत नाहीत.

स्नेहसंमेलनाच्या तारखेपर्यंतचे मधले दिवस मंतरलेले होते. घरात मला बोलायला आणि इतरांना चिडवायला दुसरा विषयच नव्हता. रुपेरी स्नेहसंमेलनाच्या कल्पनेचा

वर्ष चढून प्रतीक्षेचे ते दिवसही रुपेरी होऊन गेले होते. प्रत्यक्ष कार्यक्रमाचा दिवस... त्याची चव तर सत्यनारायणाच्या प्रसादासारखी होती. साजुक, मधुर आणि खमंग ! इतके वर्षानंतर सगळ्यांना भेटतापहाताना मन भरून आलं होतं. सगळ्याच्यांतच किती बदल झाला होता. मुलींकडे बघून झुलपं उडवणाऱ्या मॉनिटरच्या माथ्यावर पौर्णिमेच्या चंद्रमा उगवला होता. हुतुतुचा कॅप्टन गुडघ्यचे सांधे दाबत चालत होता. पाठीवरच्या लांबसडक वेणीला हेलकावे देत सगळ्या मुलींना जळवत डौलात चालणाऱ्या निलू मोघेच्या पाठीवर आता छान पिकलेली पोनीटेल उरली होती. तेव्हाच्या कोवळ्या काकड्यांचेआता पार भोपळे झालेले. काही चेहरे तर प्रयत्नपूर्वकच ओळखावे लागत होते. माणसांपेक्षाही गाव जास्त बदललं होतं. जे शाळा सोडल्यानंतर आजच पुनः गावात आले होते, त्यांची अवस्था भारावणे या क्रियापदापलिकडची ! आमच्या मॉनिटरने कार्यक्रमाची आखणी मात्र अगदी छान आणि भरगच्च केली होती. पुन्हा नव्याने ओळख. जुन्या आठवणींना उजाळा देत दुपारचं एकत्र जेवण. काही जुने शिक्षक निवृत्त झाले होते पण गावातच होते. संध्याकाळी त्यांचा सत्कार समारंभ आणि मनोगत. आणि मग त्यापुढचा दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळापर्यंतचा वेळ केवळ आमचाच. नितीन साळुंके म्हणजे आमच्या वर्गाचा महंमद रफी. जयजय महाराष्ट्र माझा हा त्या पेटंट पोवाडा. त्या पोवाड्यानेच या कार्यक्रमाची सुरुवात करायची ठरली. नितीनने आपल्या खड्या आवाजात तो पोवाडा म्हणायला सुरुवात केली मात्र, जुन्या आठवणींची प्रत्यक्ष अनुभूती मिळाल्यासारखी सगळ्यांचीच मन थरारली. दोघीतिघींच्या डोळ्याला तर अश्रुधारच लागल्या. आणि आपलं प्रौढ वय विसरुन त्यांनी त्या तशाच वाहूही दिल्या. या अशा गहिवरलेल्या वातावरणातच एकेकजण उठून शाळेबद्दलची आपली आठवण, मधल्या पंचवीस वर्षातली वाटचाल सांगायला लागला. सांगता सांगता आनंदाश्रु झरायला लागले. वातावरण खरोखरच रुपेरी होऊन गेलं.

सगळ्याच वर्गातून एखादा तरी नग असतोच. आमच्या वर्गातही तो अनिल कामतच्या रुपात होताच. एवढ्या भारावलेल्या कार्यक्रमावर भाष्य करताना तो म्हणाला, गावातच होतो म्हणून मी कार्यक्रमाला हजर राहिलो. पण तुम्ही सगळे कौतुक करताय तेवढं काही मला ग्रेटबिट वाटत नाही. आजकाल अशा रुपेरी स्नेहसंमेलनाची फॅशनच आलीय. पण माझ्या मते पंचवीस वर्षे पूर्ण करणे हा पराक्रमच मानायचा झाला तर, कॅलेंडरची निर्जीव पानंसुद्धा तो करतात. त्यासाठी एवढा मोठा सोहळ कशाला हवा?

त्याचं हे तत्त्वज्ञान आम्हाला कुणालाच पटलं नाही. पण त्याचा स्वभाव ठाऊक होता म्हणून म्हणा किंवा आनंदी मूडमध्ये होतो म्हणून म्हणा पण कुणीच ते अगदी रागावण्याइतकंही मनावर घेतलं नाही. परतीच्या प्रवासात सगळ्या घटनांची मनाशी उजळणी करताना मात्र अनिलचं ते वा य आठवून मी अंतर्मुख झाले. खरंच कालानुसार जे अपरिहार्यपणे घडतं त्याचे एवढे सोहळे का माजवतो आपण? विशेषतः आपली पिढी. आणि अनिल कामत म्हणाला तसं ते रुपेरी विशेषण कशाला हवं? (मध्यंतरी एका नवीन सुरु झालेल्या दुकानाने रुपेरी ग्राहक अशी अभिनव योजना जाहीर केली होती. म्हणजे दर पंचविसाव्या ग्राहकाला ते खरेदीवर विशेष सूट देणार होते. तेही मला आठवून गेलं.)

एखाद्या नावडत्या पदार्थाचा कण दातात अडकून रहावा तसा प्रवासभर मला अनिलच्या स्वरातल्या रुपेरी शब्दाबद्दलचा तिरस्कार त्रास देत राहिला. तो चुकवण्यासाठी माझ्या परीने मी आमच्या रुपेरी स्नेहसंमेलनाचं मूळ कारण शोधत राहिले. रौप्यमहोत्सव किंवा सिल्व्हर ज्युबिली हा शब्द आता तसा नवीन राहिलेला नाही. खरं म्हणजे माणूस जेवढा समाजप्रिय प्राणी आहे, तेवढाच सोहळाप्रियही आहे. आपला आनंद, आपलं यश आपल्या माणसात मिरवून आपलं सुख सुख हंड्याझुंबरं टांगलं... म्हणण्याचा मोह झालाच की! आणि शंभर हा त्याच्या दृष्टीने फार मोठा आणि शुभ पूर्णांक! म्हणून मग सगळे आनंद त्या पटीत साजरे करण्याची पद्धत पडली असेल. बाकीच्या गोष्टीचं ठीक आहे. पण वर्षातून एकदाच येणारा वाढदिवस साजरा करण्यासाठी शंभरीपर्यंत थाबायचं? आनंद वाटण्यसााठी उतावीळ झालेल्या मनाला हा कालावधी पटण्यासारखा नव्हताच म्हणून मग त्याने चार सोपे टप्पे करुन ही चार वेळा आनंद साजरा करण्याची धूर्त युक्ती शोधून काढली असावी. त्यातही पंचविशीला जास्त महत्त्व. कारण तो प्रत्येकाच्या आवा यातला कालावधी. पन्नाशीला शरीर थकतं. पंचाहत्तरीत बुद्धीची खात्री उरलेली नसते आणि शंभरी गाठणं म्हणजे तर केवळ देवाचीच कृपा ! त्यामानाने पंचविशीत रक्तात उत्साह सळसळत असतो. मनगटात धमक असते. आणि मनात उमेद असते. अशा त्रिगुणी आनंदाची चमक रुपेरी असेल म्हणूनच पंचविसाव्या वाढदिवसाला रोप्यमहोत्सव म्हणत असावेत.

आमच्या कंपनीत एखाद्या कर्मचाऱ्याने नोकरीची पंचवीस वर्ष पूर्ण केली तरी तो दिवस आनंदाने साजरा करण्याची पद्धत आहे. तो कर्मचारी कोणत्याही पदावर असला तरी, त्यादिवशी कंपनीच्या प्रांगणात त्याच्या हातून वृक्षारोपण केलं जातं. त्या वृक्षराजीला नाव दिलंय सिल्व्हर ज्युबिली गार्डन!

किती सुंदर प्रथा. आपल्या जीवनातली रुपेरी छटा आपल्या कर्मभूमीत वृक्षरुपाने रोवून ठेवायची. तिचा बहर जपायचा प्रयत्न करायचा. आयटीच्या संस्कारात न्हालेली नवी पिढी या प्रथेला अनिल कामतसारखीच नाकं मुरडते. कारण एकाच ठिकाणी पंचवीस वर्ष नोकरी ही कल्पनासुद्धा त्यांच्या

विचारशक्तीला पेलवत नाही. पण आम्ही जुनेजाणते कर्मचारी मात्र तरीही आपापली पंचविशी धामधुमीत साजरी करतो. कारण पोटाला भाकरी देणाऱ्या संस्थेशी पंचवीस वर्ष आपल्या निष्ठा बांधून ठेवणं आम्हाला महत्त्वाचं वाटतं.

पंचवीस वर्षाची आणखी एक किमया म्हणजे हा कालावधी कुठल्याही जवळच्यालांबच्या नात्यांमधला तिखटपणा मवाळ कराते आणि गोडवा वाढवतो. अकरावीच्या वर्गातले आम्ही सगळे पंचविशीसाठी जमलो तेव्हा लहानपणी आपण जीव खाऊन भांडायचो, एकमेकांना टोमणे मारायचो, शिक्षकांकडे चहाड्या करायचो हे कुणाच्या लक्षात सुद्धा नव्हतं... सगळे हेवेदावे त्या रजतप्रवाहात कुठल्याकुठे वाहून गेले होते.

रामेश्वरच्या सहलीला गेलो असताना बघितलेली अशीच एक मजेशीर घटना. तिथे एका प्रौढ जोडप्याचं लग्न लावलं जात होतं. म्हणजे मुळात ते दोघं नवराबायकोच होते. त्यांच्या लग्लाला पंचवीस वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रामेश्वरच्या समुद्रकिनारी हा पुर्नसोहळा रंगला होता. माणसं तीच! पण एकत्र नांदताना त्यांच्या स्वभावाचे धारदार कंगोरे झिजलेले असतात. स्वभावातल्या नकोशा छटांचे रंग फिके वाटायला लागलेले असतात. आणि म्हणूनच जोडीदार तोच आला तरी, पंचवीस वर्षानंतर त्या सहजीवनात नावीन्य येतं.

रुपेरी स्नेहसंमेलनाच्या परतीचा प्रवास संपवून मी गाडीतून उतरले, तेव्हा माझ्या मनात त्या संमेलनाच्या राजवर्खी आठवणी तर दाटलेल्या होत्याच. पण अनिल कामतच्या तिरकस प्रश्नाचं उत्तर सापडल्याचा आनंदही भरून आला होता. आता मी अनिल कामत भेटण्याची वाट पाहातेय. अगदी मनापासून मला त्याला सांगायचंय, प्रत्येकाच्या आयुष्यात कोणत्या ना कोणत्या कालखंडाची अशी रुपेरी संमेलन भरवणं आवश्यकच आहे रे. त्याशिवाय आपल्या एकमार्गी जीवनप्रवाहात आठवणींची सौम्यसुखद चमक आणि मनातल्या विखारी शत्रुत्त्वाची बोथटलेली धार हे अनुभव आपल्याला कसे भेटणार?



——————————————— *प्रमोदिनी वडके-कवळे*

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८



## दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी


| | | |
|---|---|---|
| समिधा | रणजित देसाई | १०० |
| बारी | रणजित देसाई | १२० |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८० |
| आलेख | रणजित देसाई | १२० |
| मेघ | रणजित देसाई | १०० |
| आषाढ | रणजित देसाई | ८० |
| वैशाख | रणजित देसाई | ९० |
| पंख जाहले वैरी | रणजित देसाई | ५० |
| पांगुळगाडा | रणजित देसाई | ६० |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६० |
| स्नेहधारा | रणजित देसाई | ९० |
| संचित (अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६० |


| | | |
|---|---|---|
| नवी स्त्री | वि. स. खांडेकर | १०० |
| अबोली | वि. स. खांडेकर | ५० |
| दवबिंदू | वि. स. खांडेकर | ६० |
| ढगाआडचे चांदणे | वि. स. खांडेकर | ६० |
| समाधीवरली फुले | वि. स. खांडेकर | ६० |
| अश्रु आणि हास्य | वि. स. खांडेकर | ९० |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५० |
| क्षितिजस्पर्श | वि. स. खांडेकर | ८० |
| सांजसावल्या | वि. स. खांडेकर | ८० |
| वन्हि तो चेतवावा! | वि. स. खांडेकर | ७० |
| सहा भाषणे | वि. स. खांडेकर | ७० |
| तारका | वि. स. खांडेकर | ४० |
| नटरंग | आनंद यादव | १४० |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११० |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९० |
| झाडवाटा | आनंद यादव | ९० |
| स्पर्शकमळे | आनंद यादव | १०० |
| का रे भुललासी | व. पु. काळे | १२० |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७० |
| दुनिया तुला विसरेल | व. पु. काळे | ५० |
| प्रेममयी | व. पु. काळे | १०० |
| रंगपंचमी | व. पु. काळे | २०० |
| सांगे वडिलांची किर्ती | व. पु. काळे | ७० |
| माणसं | व. पु. काळे | १७० |
| एक एक पाऊल : ओशो | अनु. भारती पांडे | ८० |
| मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| साक्षात्काराची देणगी : ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १५० |
| वुइ दि नेशन (नानी पालखीवाला) | वि. स. वाळिंबे | २०० |











| | | |
|---|---|---|
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३०० |
| लज्जा (कादंबरी) | अनु. लीना सोहोनी | १२५ |
| निर्बाचित कबिता (कविता) | अनु. मृणालिनी गडकरी | ७० |
| आंधळी : कॅथरीन पियर्स | शान्ता शेळके | १०० |
| गोंदण | शान्ता शेळके | ५० |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १०० |
| सांगावेसे वाटले म्हणून... | शान्ता शेळके | ९० |
| सुवर्णमुद्रा | शान्ता शेळके | ८० |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८० |
| व्हॉट वेंट रॉंग? | अनु. लीना सोहोनी | २०० |
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ८० |
| निसर्गपुत्र (अनुवादित) | निरंजन घाटे | ८० |
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३० |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५० |
| विज्ञानाचे शतक | निरंजन घाटे | २०० |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १०० |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५० |
| पोलिसकथा | व. कृ. जोशी | १५० |
| भीषण हत्याकांड | व. कृ. जोशी | ९० |
| खेकडा | रत्नाकर मतकरी | ८० |
| तनमन | रत्नाकर मतकरी | ४० |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६० |
| मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७० |
| परिशोध : एस. एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी | १०० |
| अंतराळ : शांतिनाथ देसाई | उमा कुलकर्णी | १०० |
| अवस्था : यु. आर. अनंतमूर्ती | उमा कुलकर्णी | ११० |
| सीमारेषा | माधवी देसाई | २०० |

| | | |
|---|---|---|
| हरवलेल्या वाटा | माधवी देसाई | ८० |
| धुमारे | माधवी देसाई | ७० |
| सागर | माधवी देसाई | ६० |
| वडवाई | अंजनी नरवणे | २०० |
| तत्वमसि | अंजनी नरवणे | १४० |
| टेक् २५ : भावना सोमय्या | अंजनी नरवणे | ४०० |
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस | अंजनी नरवणे | १२० |
| काँगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६० |
| ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २५० |
| द लास्ट डॉन : मारिओ पुझो | अनु. अनिल काळे | ३५० |
| क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५० |
| दि फिस्ट ऑफ गॉड : फ्रेडरिक फोरसिथ | अनु. अनिल काळे | ३०० |
| डॉ. झिवागो : बोरिस पास्तरनाक | अनु. आशा कर्दळे | २५० |
| ३००१ द फायनल ओडिसी | | |
| : आर्थ सी. क्लार्क | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | १६० |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५० |
| देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय (बंगाली) | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | अनु. लोकापूर/कानिटकर | ८० |
| टोकियोच्या नभांगणातील चमकत्या | | |
| तारका : फिलिस् बर्नबॉम | अनु. सुधा नरवणे | १८० |
| द्वंद्व : विजयदान देथा (राजस्थानी कथा) | अनु. वनिता सावंत | १५० |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५० |
| फुलांचे बोल : आन्ना साक्से (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १०० |
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३० |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया | | |
| :नवाझ मोदी | अनु. वासंती फडके | ३०० |
| योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती | | |
| ए.पी.जे.अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४० |
| सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप | | |
| : खुशवंतसिंग | अनु. अनिल किणीकर | १२५ |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६० |
| मदर टेरेसा : ॲन सेबा | अनु. अनंत बेदरकर | २५० |
| टाईमपास : प्रोतिमा बेदी | अनु. सुप्रिया वकील | १८० |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा | | |









| | | |
|---|---|---|
| रंगास्वामी पार्थसारथी | अनु. लीना सोहोनी | १२० |
| द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५० |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| मुलांवरचे संस्कार (राज्य पुरस्कार) | शं. व्यं. काश्यपे | ९० |
| संस्कार कथा | शं. व्यं. काश्यपे | ६० |
| प्रियाराधन आणि विवाह | | |
| : डॉ. विजय नागस्वामी | अनु. भारती पांडे | १५० |
| सुखद मातृत्व | डॉ. रत्नावली दातार | ७० |
| डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी | डॉ. विकास/विनिता गोगटे | २५० |
| हसता हसता आरोग्य | अनु. दिगंबर गाडगीळ | ९० |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९० |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु. मीना टाकळकर | १०० |
| प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू | यशोधरा भोसले | १५० |
| शिवणकला एक छंद : सलवार कमिज, | | |
| स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी | हेमा कळके | ८० |
| विज्ञान गमती | डॉ. अरुण मांडे | ५० |
| विज्ञान जमती | डॉ. अरुण मांडे | ६० |
| विश्वातील सजीवसृष्टी | अनु. डॉ. बाळ फोंडके | ६० |
| संप्रेरकांची सुसंगती : पी. डी. गुप्ता | अनु. मीना किणीकर | ५० |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : | | |
| कुलकर्णी/भागवत/गंभीर | अनु. मीना किणीकर | ७० |
| हिरवे जनुक : शाकुंतला भट्टाचार्य | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ६० |
| संभव असंभव | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ८० |
| बिजलीदेवीची कहाणी | गोविंद लक्ष्मण परांजपे | ८० |
| नामशेष झालेले प्राणी | डॉ. किशोर पवार | ५० |
| शरीरातील विविध संस्था - | | |
| फुफ्फुसे, हृदय, मेंदू | वैशाली जोशी | २५ |
| अंतःस्त्राव, गर्भाशय, जठर | वैशाली जोशी | २५ |
| स्नायू, अस्थि | वैशाली जोशी | २५ |

| | | |
|---|---|---|
| व्हर्च्युअल रिॲलिटी (कथा) | डॉ. बाळ फोंडके | १५० |
| पृथ्वीवर माणूस उपराच! (संशोधन) | सुरेशचंद्र नाडकर्णी | ७० |
| अज्ञाताचे विज्ञान (संशोधन) | सुरेशचंद्र नाडकर्णी | १३० |
| सुंदर आपली फुलबाग | आ. बा. पाटील | १०० |
| सुंदर आपला रोपमळा | आ. बा. पाटील | १२० |
| एकवचनी | संजय राऊत | ३५० |
| ख्यातनाम इतिहासकार : अरूण शौरी | अनु. सुधा नरवणे | १५० |
| बिग इगोज, स्मॉल मेन : राम जेठमलानी | अनु. माधव मोर्डेकर | ८० |
| द अदर साईड ऑफ सायलेन्स : उर्वशी बुटालिया | अनु. नारायण आवटी | २५० |
| महात्मा (जोतीराव फुले) | डॉ. रवींद्र ठाकूर | ३०० |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५० |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५० |
| शापित राजहंस | अनंत तिबीले | २५० |
| मृद्‌गंध | इंदिरा संत | १६० |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ७० |
| आठवणींचा मोहर | राजाभाऊ गवांदे | १६० |
| बंजाऱ्याचे घर | यशोधरा भोसले | १५० |
| धागे : गुलजार | संपादन : अनंत दीक्षित | ६० |
| ओसरलेले वादळ | कुमार केतकर | १२० |
| गज़ल | प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी | १८० |
| रिवणावायली मुंगी | राजन गवस | १३० |
| कावळे आणि माणसं | उत्तम कांबळे | १०० |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १३० |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५ |
| गुंता सोडविताना | अनुराधा गुरव | ११० |
| पाणी कुठंवर आलं गं बाई... | दया पवार | २५ |
| नको स्वातंत्र्य स्त्रीला | दिलीप परदेशी | ५० |
| मराठी कादंबरीचा इतिहास | चंद्रकांत बांदिवडेकर | १७० |
| मराठी रोमँटीक काव्यप्रतिभा | रमेश तेंडुलकर | १३० |






## ❒ नाट्य समीक्षक प्रोत्साहन पुरस्कार

संत साहित्याचे अभ्यासक आणि नामवंत समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी लिखित व उत्कर्ष प्रकाशित अमृतानुभवाच्या वाटेने या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शं. रा. तळघट्टी यांच्या हस्ते झाले डॉ. व . दि. कुलकर्णी स्मृति समितीतर्फे नाट्य समीक्षक प्रोत्साहन पुरस्कार डॉ. प्रा. पुष्पा तापस यांना सन्मानपत्र आणि रोख स्वरुपात देण्यात आला. याप्रसंगी प्रा. पुष्पा तापस म्हणाल्या, सार्वजनिक उत्सवात होणाऱ्या नाटकामुळे मी या क्षेत्राकडे वळले आणि चौखंदळ पुणेकरांनी दिलेल्या पुरस्काराने मी भारावून गेले आहे. डॉ. प्रकाश सोमण यांनी ग्रंथ परिचय करुन दिला व सुलभ व तात्त्विक दृष्टीने लिहिलेले लिखाण संत विषयक साहित्यात मोलाची भर टाकणारे आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. यावेळी डॉ. करंदीकर, सु. वा. जोशी यांची भाषणे झाली. डॉ. अंशुमती दुनाखे यांनी आभार प्रदर्शन केले.

## ❒ रमा रुईया, डॉ. सरदेसाई यांना बा - बापू पुरस्कार

ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत रमा रुईया यांना यंदाचा बा पुरस्कार आणि ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई यांना बापू पुरस्कार जाहीर झाला आहे. अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. सामाजिक कार्यकर्ते अन्वर राजन आणि आशा कुलकर्णी यांना विधायक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रत्येकी पाच हजार रुपये व मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरुप आहे. राज्यपाल एस. एम. कृष्णा यांच्या हस्ते गांधी जयंतीच्या दिवशी आगाखान पॅलेस येथे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले गेले. पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने गांधी विचार केंद्रा चेही उद्‌घाटन या वेळी झाले.

## ❒ शीला जोशी यांना केंद्राची फेलोशिप !

ज्येष्ठ गायिका श्रीमती शीला जोशी यांना केंद्र सरकारतर्फे सिनिअर रिसर्च फेलोशिप देण्यात आली आहे. प्रिन्सिपल्स ऑफ स्ट्रेस मॅनेजमेंट थ्रू म्युझिक इन द स्पेशल कॉन्टे स्ट ऑफ इंडियन लासिकल व्होकल म्युझिक ॲड आयुर्वेद हा त्यांचा विषय असून, वैद्य योगेश गोडबोले यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले आहे. यापूर्वी त्यांना केंद्र सरकारची राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती, तसच सूरमणी पुरस्कार, पं. दीनानाथ मंगेशकर पुरस्कार मिळाले आहेत.

## ❒ पुरुषोत्तम करंडक : निकाल आणि नाराजी

महाविद्यालयीन आणि कलाजगतात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने बाजी मारली, सर्वोत्कृष्ट अभिनय आणि दिग्दर्शनाच्या व्यक्तिगत पारितोषिकासह मानाचा पुरुषोत्तम करंडक या महाविद्यालयाच्या संघाने सादर केलेल्या सायकल या एकांकिकेला मिळाला आहे. बीएमसीसीच्या अमेय वाघ या विद्यार्थ्याला सर्वोत्कृष्ट अभिनयनैपुण्याचे पारितोषिक मिळाले आहे. द्वितीय क्रमांक हरी विनायक करंडक पुणे विद्यार्थीगृहाचाया अभियांत्रिकी कॉलेजच्या स्क्वेअर वन या एकांकिकेने पटकाविला. तृतीय क्रमांक संजीव करंडक स. प. महाविद्यालयाच्या एक होता कुतुबुद्दिन या एकांकिकेला मिळाला आहे. सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेसाठीचा जयराम हर्डीकर करंडक कमिन्स मुलींच्या अभियांत्रिकी कॉलेजच्या संघाच्या खिडकी ला मिळाला.

सर्वोत्कृष्ट आयोजित संघाच्या भालचंद्र पारितोषिक व भगीरथ करंडक पुणे विद्यार्थिगृहाच्या संघास मिळाले आहे. याच संघाच्या रोहित भोपटकरला अभिनयासाठी तर सिद्धार्थ भटेवराला दिग्दर्शनाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. प्राथमिक फेरीसाठी मधुरा गायकवाडला दिग्दर्शनासाठीचे उत्तेजनार्थ तर कश्यप देशपांडे आणि प्रणव मणुरकर विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय तसेच केतकी मोडक (कमिन्स) हे यशस्वी ठरले आहेत.

इतर पारितोषिक पुढीलप्रमाणे - अभिनयनैपुण्य - अभिनेत्री श्वेता मोरे (टिळक आयुर्वेद), सर्वोत्कृष्ट विद्यार्थी दिग्दर्शक - निपुण धर्माधिकारी (बीएमसीसी), सर्वोत्कृष्ट लेखक - धर्मकीर्ती सुमंत (फर्ग्युसन), सर्वोत्कृष्ट प्रायोगिक लेखक - मधुराणी सप्रे (कमिन्स). या पारितोषिकांबरोबरच पुढील दहा कलाकारांना अभिनयाची उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली आहेत. धनंजय भावलेकर (नेस वाडिया), पुष्कर खरे, स्वानंद कुलकर्णी (स.प.) बांदल इरले आणि अमोल कांबळे (गरवारे महाविद्यालय), धर्मकीर्ती सुमंत (फर्ग्युसन), अमृता तगारे, स्नेहल जोशी (कमिन्स) आवाज कुणाचा... हिप हिप हुर्रे .. अशा घोषणांच्या साथीत टिपेला पोहोचलेल्या उत्कंठावर्धक वातावरणात महिनाभर रंगलेल्या या स्पर्धेची सांगता झाली. अंतिम फेरीत पोहोचलेल्या सहा एकांकिकेतील विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयात आणि त्यांच्या समर्थकांनी त्यांचा उत्साह वाढविण्यात कोणतीही कसर सोडली नाही. यावर्षी स्पर्धेमध्ये ४० महाविद्यालयांच्या मिळून ४२ एकांकिका सहभागी झाल्या होत्या. त्यातील ९ एकांकिका अंतिम फेरीत पोहोचल्या होत्या.

होरा ऐकाजी (नेस वाडिया महाविद्यालय), शिमगा (इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड करिअर कोर्सेस), एक होता कुतुबद्दिन, (स.प.महाविद्यालय), स्क्वेअर वन (पुणे विद्यार्थीगृहाचे अभियांत्रिकी महाविद्यालय), माय फेअर रेडी (आबासाहेब गरवारे महाविद्यालय), आय ॲण्ड आयडॉल (फर्ग्युसन महाविद्यालय), काकपिंड (टिळक



आयुर्वेद महाविद्यालय), खिडकी (कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय) आणि सायकल (बीएमसीसी) या एकांकिका अंतिम फेरीत सादर झाल्या. राहुल सोलापुरकर, मीना नाईक आणि शशिकांत कुलकर्णी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

## ❒ पुणे फेस्टिव्हल पुरस्कार

यंदाचा पुणे फेस्टिव्हल सन्मान धीरुभाई अंबानी फाऊंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी आणि पुण्यातील ख्यातनाम डॉक्टर ह. वि. सरदेसाई यांना रेणुका चौधरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. चित्रलेखा पुरंदरे यांनी लिहिलेल्या राजमान्य राजश्री या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यावरील पुस्तकाचे आणि गजाननाच्या विविध रुपांची माहिती देणाऱ्या विश्ववंद्य गणेश या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. राज्याची प्राचीन परंपरा, गणेशोत्सवाचा इतिहास, नृत्याचे अनेविध पैलू, लावणी आणि पाश्चात्त्य संगीताचे फ्युजन अशा कलाविष्कारांत सतराव्या पुणे फेस्टिव्हल २००५ ला सुरवात झाली. गणेश कला क्रीडा मंच येथे सायंकाळी नेहमीच्या पद्धतीने अनेक कलांचा कोलाज सादर करण्यात आला. पर्यटन राज्यमंत्री रेणुका चौधरी यांनी दीपप्रज्वलन करुन पुणे फेस्टिव्हलचे उद्घाटन केले. फेस्टिव्हलचे अध्यक्ष खासदार सुरेश कलमाडी, महापौर रजनी त्रिभुवन, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, कार्याध्यक्ष कृष्णकांत कुदळे, ट्रस्टी डॉ. दीपक टिळक, दिग्दर्शक जब्बार पटेल, नीता अंबानी, डॉ. ह. वि. सरदेसाई आणि चीन, इटली, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, दक्षिण आफ्रिका, रशिया यांचे राजदूत व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वांनी गणेशाची आरती केली. नमस्कार पुणेकरहो... अशी सुरवात करून रेणुका चौधरी म्हणाल्या, आपल्या सांस्कृतिक वैभवाचे संचित फेस्टिव्हल सारख्या माध्यमाद्वारे पुढच्या पिढीपर्यंत पोचायला हवे. अभिनेत्री ईशा शर्वाणीने गणेश वंदना सादर केली. शाहीर हेमंत मावळे यांचा पोवाडा आणि मीनाक्षी शेषाद्रीने नृत्यांगनांसमवेत सादर केलेल्या श्री गणेशाय धीमही या नृत्याने समारंभात रंग भरले. महाराष्ट्रातील विविध सणांचा मागोवाही रंगमंचीय आविष्कारातून घेण्यात आला. श्री. कलमाडी म्हणाले, की फेस्टिव्हल सुरु करणे सोपे असले, तरी तो सातत्याने चालू ठेवणे अवघड आहे. पूरग्रस्तांसाठी खासदार निधीतून दोन कोटी रुपयांची मदत श्री. कलमाडी यांनी जाहीर केली.

## ❒ वसंत फेणे यांना जयवंत दळवी पुरस्कार

मॅजेस्टिक प्रकाशन तर्फे देण्यात येणारा जयवंत दळवी स्मृती पुरस्कार यंदा विश्वंभरे बोलविले या वसंत नरहर फेणे यांच्या कादंबरीला देण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांच्या हस्ते १६ सप्टेंबरला मुंबई (दादर) येथील बनमाळी सभागृहात पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

❒